बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बीड | गुरूवार,दि.१२ डिसेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक१२६वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३




# परभणीत संविधानाचा अवमान
## संतप्त: जाळपोळ, दगडफेक, लाठीमार, परभणी बंद

परभणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परभणी शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर ठेवलेल्या संविधानाची एका माथेफिरुने विटंबना केली. या घटनेनंतर परभणी शहरातील आंबेडकरी अनुयायी संतप्त झाले आहेत. आज परभणी बंदची हाक देण्यात आली होती. मात्र या आंदोलनाला आक्रमक वळण लागले आहे. काही आंदोलकांकडून दुकानांची जाळपोळ करण्यात आली. यानंतर पोलिसांनीही आंदोलकांना पांगवण्यासाठी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या. यामुळे सध्या परभणीत तणावपूर्ण स्थिती पाहायला मिळत आहे.परभणी शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. या पुतळ्यासमोर संविधानाची, घटनेची प्रत ठेवण्यात आली आहे. काल मंगळवारी पान २ वर...



### काल झालेली घटना दुर्दैवी

आंबडेकरी अनुयायींना आवाहन करतो की काल झालेली घटना ही दुर्दैवी आहे. या घटनेचा मी निषेध करतो. पण आता जी काही परिस्थिती आहे, ती शांततने हाताळावी. या घटनेचा निषेध नोंदवताना इतरांना जो काही त्रास होणार नाही याचीही आपण काळजी घेतली पाहिजे, अशी प्रतिक्रिया ठाकरे गटाचे खासदार संजय जाधव यांनी दिली.




# हत्या प्रकरणाची सीआयडी चौकशी व्हावी
## दखल:खा.बजरंग सोनवणे थेट अमित शाहांना भेटले



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं सोमवारी (९ डिसेंबर) दुपारी अपहरण केल्यानंतर सायंकाळी त्यांचा मृतदेह पोलिसांच्या पथकाला आढळून आला. यानंतर मस्साजोगच्या ग्रामस्थांनी केज पोलीस ठाणे व उपजिल्हा रुग्णालय परिसरात धाव घेतली. संतोष देशमुख यांचा खून झाल्याची प्राथमिक माहिती असून, मारेकऱ्यांना जोपर्यंत अटक होणार नाही तोपर्यंत त्यांचा मृतदेह ताब्यात घेतला जाणार नाही, असा आक्रमक पवित्रा ग्रामस्थांनी घेतला होता. आरोपींना लवकरात लवकर पकडावं, या प्रकरणाचा सीआयडीमार्फत तपास करावा अशा मागण्यांसाठी ग्रामस्थांनी आंदोलन देखील केलं. गावकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेत बुधवारी महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करत आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी केली. तसेच या संपूर्ण प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करण्याची मागणी देखील केली. ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन केल्यानंतर या पान २ वर...



## ‘परदेशी हाता’चे भूत!

जगातील ‘लोकशाहीची जननी’ इत्यादी भरतवर्षाने भारताचा रहिवासीही नसलेल्या सोरोस यांची इतकी भीती का बाळगावी आणि त्यांच्या नावे इतके खडे का फोडावेत?

स्वसामर्थ्याच्या प्रामाणिक जाणिवेचा अभाव असलेले प्रत्येक संकटासाठी इतरांस बोल लावतात तर खरे कर्तृत्ववान श्रेयासह अपश्रेयाचेही धनी होण्यात मागेपुढे पाहात नाहीत. व्यक्तींस लागू असलेला हा नियम व्यक्तिसमूहांच्या प्रदेशासही लागू होतो. या चिरंतन सत्याची जाणीव नव्याने करून देणाऱ्या दोन घटना. पहिलीत अमेरिका आपणास अस्थिर करण्याच्या प्रयत्नात असल्याचा अप्रत्यक्ष ठपका आपल्याकडून लावला गेला आणि दुसरीत धनाढ्य गुंतवणूकदार जॉर्ज सोरोस यांच्यावर आपल्याकडून तशाच स्वरूपाचा आरोप केला गेला. हे वयोवृद्ध सोरोस काँग्रेसच्या सोनिया गांधी यांच्याशी हातमिळवणी करून जम्मू-काश्मीर आपल्यापासून तोडण्याचा घाट घालत असल्याचे काही सरकारी उच्चपदस्थांचे म्हणणे. या विद्वत्तापूर्ण भाकितावर हसावे की रडावे असा प्रश्न. एरवी हे असले विनोदी वाङ्मय कोणा यूट्यूबरने वगैरे प्रसवले असते तर त्या निर्बुद्ध बडबडीकडे दुर्लक्ष करण्याची सोय होती. या बाबत ती नाही. कारण पाकिस्तानला तीन प्रत्यक्ष युद्धांत आणि असंख्य अप्रत्यक्ष संघर्षांत जे जमले नाही ते वयाच्या नव्वदीतले हे सोरोस पंचाहत्तरीतल्या, तब्येतीने अशक्त अशा सोनिया गांधी यांच्या साह्याने करून दाखवतील असे मानणाऱ्यांस काय म्हणावे? त्याच वेळी; अर्थव्यवस्थेत आपल्यापेक्षा साधारण पाच पट मोठी अमेरिका संरक्षण साहित्य/ विज्ञानसंशोधन/ कारखानदारी आदी क्षेत्रांत तुलनाही होऊ शकत नाही इतक्या अ-गण्य भारतास पाण्यात पाहते असे वाटून घेणाऱ्यांसही काय म्हणावे? त्यासाठी बौद्धिक पातळीवर इलाजापलीकडचे दिव्यांगत्वच हवे. अशांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढती असल्याने या युक्तिवादांचा समाचार घेणे आवश्यक ठरते.याचे कारण हे आताच होते आहे असे नाही. इंदिरा गांधी यांच्या पराभूत मानसिकतेतील कालखंडात आपल्याकडे असे आरोप अनेकदा झाले. ‘परकीय हात’, ‘परदेशी शक्ती’ इत्यादी शब्दप्रयोग त्या वेळी वारंवार होत. भारतासमोरील सगळ्या अडचणी, संकटे, सरकारी अकार्यक्षमता इत्यादीस त्या वेळी एकच घटक जबाबदार होता. ‘परकीय हात’. हे परदेशांकडे बोट दाखवणे त्या वेळी इतके सर्रास होते की त्या वेळी विरोधी पक्षांत असलेले अटलबिहारी वाजपेयी आदी नेते इंदिरा गांधी यांची सर्रास खिल्ली उडवत. कोणा एका नेत्याच्या पत्नीस दिवस राहिले तर त्यामागे तर परदेशी हात नाही ना असे विचारण्याइतका चोथा या कारणाचा त्या वेळी विरोधकांनी केला होता. आता त्याच विरोधकांचे वंशज सत्तेवर आहेत आणि पुन्हा एकदा ‘परदेशी हात’ भारतीय राजकारणात वळवळू लागला आहे. हा योगायोग बरेच काही सूचित करतो. ‘अमेरिकेचे ‘डीप स्टेट’ भारतात अस्वस्थता निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहे’ हे सरकारी विधान आणि सोरोस आणि सोनिया गांधी यांच्यातील कथित व्यवहारांबाबत काही सत्ताधाऱ्यांची टीका यांतून हा ‘परदेशी हात’ डोकावतो. प्रथम अमेरिकी ‘डीप स्टेट’च्या कटकारस्थानाबाबत.डीप स्टेट’ म्हणजे सरकारच्या साहाय्याने पण सरकारपरोक्ष गुप्त चळवळी, यंत्रणा यांचे सुरू असलेले गुप्त उद्याोग. अलीकडच्या काळात तुर्की या देशात हा शब्दप्रयोग वापरला गेला. आपला संबंध आहे तो अमेरिकेतील ‘डीप स्टेट’शी. म्हणजे त्या देशाच्या सीआयए, एफबीआय वगैरे यंत्रणांतील पाताळयंत्री भारताविरोधात काही कारस्थाने करीत आहेत आणि त्यास सरकारी उच्चपदस्थांची फूस आहे असा त्याचा अर्थ. पण या संदर्भात प्रश्न असा की अचानक आपल्या मर्द-मजबूत, पुरुषार्थी वगैरे सरकारातील अत्यंत हुशार, कार्यक्षमादी मंत्र्यांस अचानक ‘डीप स्टेट’ची गरज का भासावी?

ती अशी की अमेरिकी सरकारी यंत्रणेने भारतीय कंपनीवर दिवसाढवळ्या कारवाई केली आहे आणि उघडपणे प्रश्न विचारले आहेत. अमेरिकी यंत्रणेबाबत, त्या देशाच्या ‘डीप स्टेट’बाबत आपणास असा काही संशय असल्यास अमेरिकेच्या भारतातील आस्थापनांवर थेट कारवाई करण्याची हिंमत आपणही दाखवायला हवी. ते इंदिरा गांधी यांस जमले नव्हते. म्हणून तरी विद्यामान सरकारने ते करून दाखवावे. गांधी कुटुंबीयांस न जमलेले करून दाखवण्याचा आनंद काही औरच! पण तसे न करता साप म्हणून भुईस किती वेळ धोपटणार? शेक्सपियरच्या ‘हॅम्लेट’मधे नायकाच्या वडिलांच्या भुताचे एक पात्र आहे. ते खुद्द नायकाखेरीज कोणालाच दिसत नाही. तरीही ते असते आणि हॅम्लेटच्या बापाचे भूत असेच त्यास म्हटले जाते. त्या धर्तीवर हे ‘परदेशी हाता’चे भूत आहे किंवा काय असा प्रश्न.

# महाराष्ट्र पुढे जाणार तरी कसा?



देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात ‘आता महाराष्ट्र थांबणार नाही!’ असा बोभाटा केला जात आहे. याचा नेमका अर्थ काय घ्यायचा? महाराष्ट्र गुजरातला गेलेले उद्योग परत आणणार आणि गुजरातच्या पुढे जाण्याची हिंमत दाखवणार? आज सात लाख कोटी रुपयांहून अधिकचे कर्ज डोक्यावर असणारा महाराष्ट्र नेमका कशात थांबणार नाही आणि कुठे जाणार आहे?

देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय कौशल्याचे वारेमाप कौतुक होत आहे. त्यांच्या राजकीय दूरदृष्टीचे आणि कौशल्याचे स्तुतिपाठ गायले जात आहेत. यशावर आरूढ झाल्यावर आजूबाजूला स्तुतिपाठक जमा होतातच. फडणवीस आता मातब्बर राजकारणी झाले आहेत त्यामुळे त्यांना स्वातंत्र्यानंतर काँग्रेसच्या नेत्यांनी आपल्याच कार्यकर्त्यांना दिलेला एक संदेश आठवत असेल,‘‘भाटांनो दूर सरा, कीर्तीचे स्तोत्र नको, त्यागाने देश फुलो, हार तुरे मात्र नको!’’ लोकसभा निवडणुकीतील अपयशानंतर फडणवीस यांच्या ब्राह्मण असण्याबाबत त्यांच्याच पक्षातील मराठा नेते वक्तव्य करत होते. महाराष्ट्रात फडणवीस कसे चालणार नाहीत याबाबतच्या बातम्या महाराष्ट्र विधानसभेचा निकाल लागण्याआधी त्यांच्याच पक्षाकडून पेरल्या जात होत्या. मग फडणवीस यांनी राजकीय कौशल्य पणाला लावले आणि दिवसाढवळ्या कोणीतरी गोवले गेले.फडणवीस हुशार आहेत याबद्दल शंकाच नाही. एकनाथ खडसे यांनी त्यांची राजकीय कारकीर्द उद्ध्वस्त करण्यात फडणवीस यांचा सहभाग नव्हता असा खुलासा केला आहेच. विनोद तावडे, चंद्रकांतदादा पाटील, पंकजा मुंडेदेखील त्यांच्या सोबत खंबीरपणे उभे आहेत. भाजप म्हणजे भारत जलाओ पार्टी असे खुलेआम विधानसभेत म्हणणारे छगन भुजबळ आणि त्यावरून सभागृह डोक्यावर घेणारे देवेंद्र फडणवीस आता एकमेकांसोबत मांडीला मांडी लावून बसतील.

आरे कारशेडसाठी रात्री झाडे तोडण्यास भाग पाडले तेव्हा फडणवीसच मुख्यमंत्री होते ना? अजित पवार यांच्याविरोधात बैलगाडीभर पुरावे असल्याचे सांगणारे, त्यांच्यावर ७० हजार कोटी रुपयांच्या सिंचन घोटाळ्याचे आरोप करून, ‘राष्ट्रवादीबरोबर कधीही जाणार नाही, आपद् धर्म म्हणून नाही, शाश्वत धर्म म्हणून नाही. नाही नाही नाही!’ असे ठामपणे म्हणणारेही फडणवीसच होते. नंतर सत्तेसाठी अजित पवार गटाला सोबत घेत त्यांच्या मूळ राष्ट्रवादी पक्षाला शिवसेनेप्रमाणेच नाव आणि चिन्हापासून वंचित ठेवण्यासाठी केंद्रातील सर्व शक्ती वापरणारे, रात्री हुडी घालून एकनाथी भारूड गाणारे फडणवीसच होते. पहाटे शपथविधी करून अवघ्या दीड दिवसासाठी सत्तेवर आल्यावर आणि ती सत्ता जाते हे लक्षात येताच महाराष्ट्राच्या वाटणीचा निधी दिल्लीला परत पाठवणारेही फडणवीसच होते.

कोविडकाळात महाराष्ट्र संकटात असताना केंद्र सरकारला पैसे पाठवा, पीएम केअर निधीसाठी पैसे जमा करा, देवळे उघडा असे आवाहन करणारेही तेच होते. शिवसेनेचे नगरसेवक घोसाळकर यांचा खून झाला तेव्हा गाडीखाली कुत्रा आला तरी आम्हाला दोषी धरणार का, असा प्रश्न करणारेही तेच. वाढवण, नाणारसारखे प्रकल्प महाराष्ट्रात केवळ अदानींसाठी येऊ देणारे, छोटी राज्ये विकासाला पोषक अशी संघाची धारणा असल्याचे सांगणारे, वेगळ्या विदर्भाला पाठिंबा देणारे, विधिमंडळात नवाब मलिकांसारख्यांवर देशद्रोहाचे आरोप करून सत्ता मिळवण्यासाठी पुन्हा त्यांनाच सोबत घेणारेही फडणवीसच होते. महाराष्ट्राला झालेल्या या जखमा मतपेटीतून व्यक्त झाल्या कशा नाहीत, हाच प्रश्न आहे.आज मुंबईसह महाराष्ट्रातील स्थानिक मराठी माणसांची अवस्था दयनीय आहे. मराठीपण हरवले आहे. राज्यातील नद्या, नाले, तलाव खाड्या बुजवून; डोंगर-कपारी फोडून खारफुटीची जंगले नष्ट करून परप्रांतीयांना कायमस्वरूपी वसवले जात आहे. आपल्या नोकरी, उद्योग-धंद्यांत त्यांना वाटेकरी करण्यात आले आहे. ६४ वर्षांत परप्रांतीयांनी आपआपले मतदारसंघ तयार करून ८३हून अधिक अमराठी नगरसेवक, २५हून अधिक अमराठी आमदार, पाचहून अधिक अमराठी खासदार निवडून देऊन महाराष्ट्राच्या राजकारणात शिरकाव केला आहे. येथील रस्ते, चौक, उद्यानांना अमराठी व्यक्तींची नावे दिली जात आहेत. मराठी शाळा संपल्यात जमा आहेत. परप्रांतीयांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी कामाचा व्हिसा कायद्यासह- सर्व शासकीय सवलतींसाठी महाराष्ट्र राज्याचा १९६० चा अधिवास कायदा बंधनकारक करावा.हिंडेनबर्ग अहवालानंतर अदानी समूहालाही याचा सामना करावा लागला. मात्र, अदानी समूहाने हे आरोप साफ फेटाळून लावले. काही दिवसांतच अदानींच्या कंपन्यांचे १०० अब्ज डॉलर्स बुडाले. अदानी यांनी गुंतवणूकदारांचा विश्वास जिंकण्यासाठी खूप प्रयत्न केले. शेअर्सच्या तारणावर घेतलेल्या कर्जाची मुदतीआधीच परतफेड केली. तरीही, समूहाचे शेअर्स आणि डॉलर बाँड्स अद्याप सावरलेले नाहीत. त्यामुळे अदानींचे भवितव्य कसे असेल याबाबत चिंतायुक्त भीती निर्माण होते असे जाणकारांचे म्हणणे आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे एकूण क्षेत्र आहे, ५५० एकर. या प्रकल्पाकरिता अदानींची धारावीबाहेरील जमीन मागणी पुढीलप्रमाणे आहे. रेल्वे : ४५ एकर, मुलुंड जकात नाका १८ एकर, मुलुंड कचराभूमी ४६ एकर, मिठागरे २८३ एकर, मानखुर्द कचराभूमी ८२३ एकर, जी ब्लॉक बीकेसी: १७ एकर, मदर डेअरी कुर्ला २१ एकर, एकूण १२५३ एकर. एवढी मुंबईतील जमीन ज्या समूहाच्या भवितव्याविषयी चिंता व्यक्त केली जात आहे, जो रोज नवनव्या वादांत सापडत आहे, अशा अदानी समूहाला दिली तर ‘महाराष्ट्र थांबणार नाही तर काय?’ महाराष्ट्र पुढे जाणार तरी कसा?

# जागतिक पातळीवरची संस्था

११ डिसेंबर १९४६ रोजी युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल चिल्ड्रन्स इमरजन्सी फंड तयार करण्यात आला आणि दुसऱ्या महायुद्धाच्या धर्तीवर झालेल्या मुलांमध्ये आपत्कालीन अन्न आणि आरोग्य सेवा केली. त्यावेळी भारतात ब्रिटिश होते. बाल कुपोषणाच्या समस्येवर कोणत्या उपाययोजना कराव्यात याबाबत युनिसेफने अविकसित देशांत कार्यशाळा आयोजित केल्या. भारतातही अशा कार्यशाळा झाल्या.१९५० मध्ये युनिसेफच्या सर्वत्र विकसनशील देशांतील मुलांच्या आणि महिलांच्या दीर्घकालीन गरजा पूर्ण करण्यासाठी आदेश देण्यात आला. १९५३ मध्ये ते युनायटेड नेशन्स सिस्टमचे कायमस्वरुपी भाग बनले आणि आंतरराष्ट्रीय आणि आणीबाणी शब्द संस्थानाच्या नावावरून काढून टाकण्यात आले आणि त्यास युनिसेफ ही मूळ संक्षेप टिकवून ठेवणारी युनायटेड नेशन्स चिल्ड्रन्स फंड अशी संज्ञा मिळाली.युनिसेफ , मूळतः संयुक्त राष्ट्रांचा आंतरराष्ट्रीय बाल आणीबाणी निधी , अधिकृतपणे १९५३ पासून युनायटेड नेशन्स चिल्ड्रन्स फंड , संयुक्त राष्ट्रांची एक संस्था आहे.जी जगभरातील मुलांना मानवतावादी आणि विकासात्मक मदत करते.ही संस्था १९२ देश आणि प्रदेशांमध्ये कार्यरत असलेल्या जागतिक स्तरावर सर्वांत जास्त ज्ञात आणि दृश्यमान सामाजिक कल्याणकारी संस्थांपैकी एक आहे. युनिसेफच्या क्रियाकलापांमध्ये लसीकरण आणि रोग प्रतिबंधक प्रदान करणे, एचआयव्ही ग्रस्त मुले आणि मातांसाठी उपचार करणे , बालपण आणि माता पोषण वाढवणे , स्वच्छता सुधारणे , शिक्षणाचा प्रचार करणे आणि आपत्तींना प्रतिसाद म्हणून आपत्कालीन मदत करते.

युनिसेफने १९४९ मध्ये तीन कर्मचारी सदस्यांसह भारतात आपले काम सुरू केले आणि तीन वर्षांनी दिल्लीत कार्यालय स्थापन केले. सध्या, ते १६ राज्यांमध्ये भारतातील मुलांच्या हक्कांसाठी लढते. युनिसेफने भारतात मुलांच्या हक्काबाबत काम केले आहे. बाल आरोग्य आणि पोषणासाठी ,सुरक्षित पाणी आणि स्वच्छता, मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि कौशल्य निर्माणासाठी प्रयत्न , माता आणि बाळांसाठी एचआयव्ही प्रतिबंध आणि उपचार, हिंसा आणि शोषणापासून मुले आणि किशोरवयीन मुलांचे संरक्षण, आयोडीनयुक्त मिठाच्या प्रचारासाठी , बाल कुपोषणाच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करून कुपोषण कमी करण्यासाठी प्रयत्न केला आणि मदत केली.युनिसेफने भारतातील सरकार आणि जनतेला अचूक आणि योग्य जीवनरक्षक माहिती , वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे, ऑक्सिजन प्लांट्स, कोल्ड चेन उपकरणे, सिरिंज आणि निदान चाचणी उपकरणांसह आवश्यक पुरवठा, लसीकरण,आरोग्य सेवा कार्यरत ठेवण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. युनिसेफ हे संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय चिल्ड्रेन्स इमर्जन्सी फंडचे उत्तराधिकारी आहे, जे ११ डिसेंबर १९४६ रोजी न्यू यॉर्कमध्ये, यूएन रिलीफ रिहॅबिलिटेशन डमिनिस्ट्रेशनने द्वितीय विश्वयुद्धामुळे प्रभावित झालेल्या मुलांना आणि मातांना तात्काळ मदत देण्यासाठी तयार केले होते . त्याच वर्षी, यूएन जनरल असेंब्लीने युनिसेफची स्थापना युद्धोत्तर मदत कार्य अधिक संस्थात्मक करण्यासाठी केली.१९५० मध्ये, विशेषत : विकसनशील देशांमधील मुले आणि महिलांच्या दीर्घकालीन गरजा पूर्ण करण्यासाठी त्याचा आदेश वाढविण्यात आला .१९५३ मध्ये, ही संस्था संयुक्त राष्ट्रांच्या प्रणालीचा कायमस्वरूपी भाग बनली आणि तिचे नाव बदलून युनायटेड नेशन्स चिल्ड्रन्स फंड असे करण्यात आले.युनिसेफ पूर्णपणे सरकार आणि खाजगी देणगीदारांच्या ऐच्छिक योगदानावर अवलंबून आहे.२०२३ पर्यंत त्याचे एकूण उत्पन्न ८.३७ अब्ज होते; ज्यामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील भागीदारांनी ५.४५ अब्ज योगदान दिले. हे ३६ - सदस्यीय कार्यकारी मंडळाद्वारे नियंत्रित केले जाते जे धोरणे स्थापित करते, कार्यक्रम मंजूर करते आणि प्रशासकीय आणि आर्थिक योजनांवर देखरेख करते. हे मंडळ संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक परिषदेद्वारे निवडलेल्या सरकारी प्रतिनिधींचे बनलेले असते , सहसा तीन वर्षांच्या मुदतीसाठी. तीन वर्षांनंतर पुन्हा प्रतिनिधी निवडले जातात. युनिसेफचे कार्यक्रम मुलांचे आरोग्य आणि कल्याण वाढवण्यासाठी समुदाय- स्तरीय सेवा विकसित करण्यावर भर देतात. युनिसेफचे १५० देश कार्यालये, मुख्यालये आणि इतर सुविधा आणि ३४ राष्ट्रीय समित्या यांचा समावेश असलेल्या नेटवर्कसह, त्याचे बहुतेक काम हे क्षेत्रात आहे, जे यजमान सरकारांसह विकसित केलेल्या कार्यक्रमांद्वारे आपले ध्येय पार पाडतात. सात प्रादेशिक कार्यालये देशाच्या कार्यालयांना आवश्यकतेनुसार तांत्रिक सहाय्य प्रदान करतात, तर त्याचा पुरवठा विभाग- कोपनहेगन आणि न्यूयॉर्क शहरांमध्ये स्थित आहे- ३ बिलियन पेक्षा जास्त गंभीर मदत आणि सेवा देते. युनिसेफच्या सर्व कामांचे मार्गदर्शन आणि देखरेख हे ३६ सदस्य असलेले कार्यकारी मंडळ आहे जे सरकारी प्रतिनिधी आहेत. मंडळ धोरणे प्रस्थापित करते, कार्यक्रम मंजूर करते आणि प्रशासकीय आणि आर्थिक योजना आणि बजेटवर निर्णय घेते. त्याचे कार्य ब्यूरोद्वारे समन्वयित केले जाते, ज्यामध्ये अध्यक्ष आणि चार उपाध्यक्षांचा समावेश असतो, प्रत्येक अधिकारी पाच प्रादेशिक गटांपैकी एकाचे प्रतिनिधित्व करतो. हे पाच अधिकारी कार्यकारी मंडळाद्वारे दरवर्षी त्यांच्या सदस्यांमधून निवडले जातात, अध्यक्षपद वार्षिक आधारावर प्रादेशिक गटांमध्ये फिरते. प्रथेप्रमाणे, सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्य कार्यकारी मंडळाचे अधिकारी म्हणून काम करत नाहीत. कार्यकारी मंडळाच्या सचिवाचे कार्यालय कार्यकारी मंडळ आणि युनिसेफ सचिवालय यांच्यात प्रभावी संबंध राखण्यास मदत करते आणि मंडळाच्या सदस्यांच्या क्षेत्र भेटी आयोजित करते.



पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२



# साहेब...

साहेब तुमचं नसणं, खरं
आत्ता आम्हाला छळतंय,
जिवंतपणीच्या आठवणींनी
मन क्षणोक्षणी हळहळतंय
तुम्ही काय दिलं,काय केलं
याची आत्ता जाणीव होतेय,
म्हणूनच साहेब महाराष्ट्राला
तुमची उणीव भासतेय.
संसद दणाणून सोडली होती तुम्ही
ओबीसींच्या हक्कांसाठी,
किंचितही मागे हटला नाहीत
मतांच्या राजकारणासाठी.
समता,ममता,जयललिता
मुलायम,लालू,पासवान
अन यादवांनाही सोबत केलं,
बहुजनांच अस्तित्व उभ्या भारताला
दाखवून दिलं.
मतमतांतरांच्या कुरघोड्यांना
तुम्हीच लगाम घातला,
वंचित,शोषितांच्या उद्धाराचा लढा
देशव्यापी केला.
बॉम्बस्फोट,गँगवार करणारांना
गृहखात्याची धडकी भरवली,
भरदिवसा गोळ्या घालणारांची
त्याच गोळ्यांनीच जिरवली.
अंडरवर्ल्ड च्या दहशतीत वावरणाऱ्या
मुंबानगरीला तुम्हीच मोकळा श्वास दिला,
गल्लीबोळातला एक-एक दादा शोधून
जागच्या जागीच गारद केला.
बाजरी न येणाऱ्या माळावर सुद्धा
हिरवेगार ऊसाचे मळे पिकवले,
तेंव्हा कुठं मराठवाड्याने
धडे सहकाराचे गिरवले.
आपल्या माथी मारल्या गेलेल्या
दुष्काळाने
मळेच्या-मळे सुकले,
अश्या खडतर काळात सुद्धा बीडकर
निव्वळ पीक विम्यामुळेच टिकले.
तुमच्या कारखानदारीत सुद्धा
शेतकरी अन कामगारांच हित होतं,
म्हणूनच आमच्या ओठी कायम
तुमचंच गीत होतं.
साहेब राजा होतात तुम्ही,
अगदी राजा सारखेच वागलात.
नुसत्या घोषणांची खैरात न करता
प्रत्येक शब्दाला जागलात.
अगदी शेवटच्या माणसाचा सुद्धा
तुम्ही आपुलकीने सन्मान केला,
म्हणूनच साहेब तुम्हाला महाराष्ट्राने
लोकनेत्याचा बहुमान दिला.
आजवर कैक नेते आले-गेले
पुढेही शेकडोंच्या फौजा येतील,
पण महाराष्ट्राच्या काळजात मात्र
गोपीनाथ मुंडेच अजरामर राहतील.

-सोपान चौधर
टी पी एस कॉलनी, परळी वै.
मो.९०११७६२८२

## पान एक वरून

**परभणीत संविधानाचा**

(१० डिसेंबर) एका माथेफिरूने संध्याकाळी ५.३० च्या सुमारास संविधानाच्या प्रतीची विटंबना केली. संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करणाऱ्याला उपस्थितांकडून जोरदार चोप देण्यात आला. त्यानंतर त्याला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या घटनेच्या प्रतीची विटंबना झाल्यानतंर आंबेडकर अनुयायी संतप्त झाले. या घटनेनंतर काल आंबेडकरी अनुयायींकडून आंबेडकर पुतळा परिसरात जोरदार निदर्शने करण्यात आली. आंदोलकांकडून काल रेल रोकोही करण्यात आला. यानतंर रात्री उशिरापर्यंत परभणीत आंदोलन सुरु होते.आज परभणी बंदची हाक देण्यात आली होती. यावेळी जिंतूर रोडवरील विसावा फाटा येथे आंबेडकरी अनुयायांनी रास्तारोको देखील केला होता. आता हे आंदोलक आक्रमक झाले असून त्यांनी दुकाने, रस्त्यावर गाड्यांची जाळपोळ करण्यास सुरुवात केली. तर काही ठिकाणी दगडफेक करण्यात आली. यानंतर काही आंदोलक महिलांनी पोलिसांवरही दगडफेक केली. यानंतर पोलिसांनीही अश्रूधुराच्या नळकांड्या फोडत आक्रमक झालेल्या आंदोलकांना पांगवण्याचा प्रयत्न केला. मात्र परभणीतील आंदोलनाला हिंसक वळण लागल्याचे दिसत आहे. सध्या पोलिसांकडून आंदोलकांना शांत राहण्याचे आवाहन केले जात आहे. तसेच सध्या परभणीत दंगल नियंत्रण पथकही दाखल झाले आहे.

**हत्या प्रकरणाची सीआयडी**

आंदोलनाला हिंसक वळण लागलं. या हत्या प्रकरणाचे राज्यभरात पडसाद उमटल्यानंतर पोलिसांनी देखील कंबर कसून तपासाला सुरुवात केली. बुधवारी दुपारी पोलिसांनी या प्रकरणातील दोन आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.बीडचे पोलीस अधीक्षक देखील मंगळवारी मस्साजोगमध्ये दाखल झाले. त्यानंतर पोलीस अधीक्षकांनी नागरिकांची समजूत घालत सर्वांना शांतता राखण्याचं आवाहन केलं. त्यानंतर गावकऱ्यांनी केलेल्या मागण्या पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी मान्य केल्या. जवळपास आठ ते नऊ तास सुरु असलेलं आंदोलन गावकऱ्यांनी पोलीस अधीक्षकांच्या विनंतीनंतर मागे घेतलं. दरम्यान, पोलिसांनी आरोपींचा शोध सुरु केला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. दरम्यान, हे प्रकरण आता केवळ राज्यापुरतं मर्यादित राहिलेलं नाही. बीडचे खासदार बजरंग सोनावणे यांनी याप्रकरणी केंद्र सरकारला हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. बजरंग सोनावणे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीवेळी त्यांनी अमित शाह यांच्यापुढे बीडमधील कायदा व सुव्यवस्थेसह लोकांच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला. सोनावणे यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की बीड जिल्ह्यात गुन्हेगारीने कळस गाठला असून जिल्ह्यातील गुन्हेगारी कमी व्हावी, अपहरणांच्या प्रकरणांची सीबीआय मार्फत चौकशी करावी, या मागणीसाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली.

**पोलीस उपनिरीक्षकावर निलंबनाची कारवाई:** मस्साजोग गावचे संतोष देशमुख यांचं अपहरण करून हत्या करण्यात आल्याची घटना घडली. या घटनेनंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात आतापर्यंत दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणात सहभागी असलेल्या इतर आरोपींवर देखील कारवाई करण्याचं काम चालू असून त्यांना देखील लवकरच अटक केली जाईल, असं आश्वासन पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी दिलं. त्याचबरोबर मस्साजोगच्या ग्रामस्थांनी एका पीएसआयवर काही आरोप केले होते. त्यानंतर त्या पीएसआयचं लगेच निलंबन करण्यात आलं आहे.

## पान सहा वरून

**गायरान जमिन नोंदीसाठी**... दिरंगाई करण्यात येत आहे.त्यामुळे गायरान जमिनी बाबत शासन निर्णयानुसार माजलगाव शिवारातील सर्वे नंबर ३३९ व फुलेपिंपळगाव शिवारातील सर्वे नंबर ९ या वर्ग २ मधून १ एक मध्ये घेण्यात याव्यात या मागणीसाठी समाजसेवक सय्यद सलीम बापू व आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे जिल्हाध्यक्ष एडवोकेट ए.एन. सय्यद यांनी उपविभागीय कार्यालया समोर बुधवारी सकाळी उपोषण सुरू केले आहे.उपोषणाला शेख इलियास मासूम. समीर सिद्दीकी. शेख महमूद महेबूब. तात्यासाहेब सुखदेव साळवे. संतोष सीताराम. संदीपण महादू साळवे. यादव तुकाराम साळवे. सचिन सीताराम साळवे. श्रेयस निवृत्ती साळवे. महिंद्र शामराव साळवे. बाबासाहेब शेषेराव डोंगरे. हे सर्व उपस्थित होते

**परळीत संविधान प्रेमींची**

आला आहे. राणी लक्ष्मीबाई टावर चौक येथे जमा होऊन कार्यकर्त्यांनी निषेधाच्या घोषणा दिल्या. व आरोपीवर कठोर कारवाई करावी अशी मागणी केली.त्याचप्रमाणे या माथेफिरूच्या पाठीशी असलेल्या सूत्रधाराचा शोध घेऊन कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. मागणीचे निवेदन परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे व शहर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक नितीन गट्टूवार यांना तहसील निवेदनाची प्रत देण्यात आली.यावेळी निदर्शने आंदोलनात मोठ्या संख्येने आंबेडकर प्रेमी सहभागी झाले होते.

**मोटारसायकल धडकेत**

नाव लक्ष्मण वैजनाथ गवारे असून तो परळी येथील रहिवासी असल्याचे समजते.घटनास्थळी परळी येथील पत्रकार महादेव शिंदे हे त्या मार्गावर येत असताना सदरील अपघात घडताच त्यांनी मदतकार्य केले.

**जीएसटी अभय योजनेची**...फाटे, सनदी लेखापाल संघटनचे सचिव श्रीगोपाल लड्डा, सनदी लेखापाल संघटना अंबाजोगाईचे सचिव पुरुषोत्तम रांदड, व्यापारी संघटनेचे कार्याध्यक्ष अशोक शेटे, विनोद पिंगळे, राजेंद्र बन्सोडे, जवाहरलाल काकंरीया, प्रकाश कनगावकर, सूर्यकांत महाजन, नागेश मिटकरी, सुदाम चव्हाण, तुकाराम साळुंके, दत्तासेट तापडीया, वर्धमान खिवंसरा यांच्यासह इतर मान्यवर सदस्य तसेच जिल्हयातील व्यापारी आदींची उपस्थिती होती. अभय योजनेची चर्चासत्रात सविस्तर माहिती मिळाल्याने जिल्ह्यातील सनदी लेखापाल व करसल्लागार तसेच व्यापार्यांनी जीएसटी विभागाचे आभार मानले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

## हॅप्पी बर्थ डे


विजया मेहता
दिग्दर्शिका


तब्बू
अभिनेत्री


मिलिंद सोमण
अभिनेता


उत्तरा केळकर
गायिका

मिलन दर्डा
माध्यम समूह

राकेश नाथ
निर्माता


अद्विक अभिजित मागाडे
५ वा वाढदिवस

## वेचक

### भाऊबीजेनिमित्त आशा भोसले यांनी आशिष शेलार यांना ओवाळले



**मुंबई :** महाराष्ट्र भूषण व प्रख्यात गायिका आशा भोसले गेली अनेक वर्षे मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार अँड आशिष शेलार यांना भाऊबीज आणि रक्षाबंधनाला राखी बांधतात. आज त्यांनी भाऊबीजेची ओवाळणी करून आशिष शेलार यांना आशीर्वाद दिले. शेलार यांनी या आपल्या दिवाळी पूर्वीच त्यांना एक अनोखी भेट दिली असून वांद्रे पश्चिम रेक्लमेश येथे आशा भोसले यांच्या नावाने "आशा सरगम सागर" असे एक सुंदर गार्डन तयार केले आहे. ज्यामध्ये आशाताईंची छान छायाचित्रे ही लावण्यात आली आहेत. तसेच रोज या बागेत त्यांची मराठी- हिंदी गाणी ही येथे येणाऱ्यांना ऐकण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. निवडणूक जाहीर होण्यापूर्वी आशाताईंच्या हस्ते या गार्डनचे लोकार्पण करण्यात आले होते.

### प्रकाश आंबेडकरांना पुण्यातील रुग्णालयातून डिस्चार्ज

**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्यावर अँजीओग्राफी आणि अँजीओप्लास्टी अशा सर्जरी पुण्यातील



एका रुग्णालयात करण्यात आल्या. त्यानंतर आज त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे, अशी माहिती वंचित बहुजन आघाडीकडून देण्यात आली आहे. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार अँजीओप्लास्टी नंतरची काळजी घेण्यासाठी आणि लवकरात लवकर बरे होण्यासाठी बाळासाहेबांना एका वेलनेस सेंटरमध्ये दाखल करण्यात आले आहे. पुढील ४-५ दिवसांत बाळासाहेब आंबेडकर हे विधानसभा निवडणूक प्रचाराला येणार असल्याचेही वंचित बहुजन आघाडीने म्हटले आहे. गुरुवारी ३१ ऑक्टोबरच्या पहाटे त्यांना छातीत दुखू लागल्याने पुण्यातील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर त्यांच्यावर अँजीओग्राफी आणि अँजीओप्लास्टी करण्यात आली. ती यशस्वी होऊन आज बाळासाहेब आंबेडकर यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. बाळासाहेबांना छातीत दुखत होते आणि अस्वस्थ वाटत होते. म्हणून त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. त्यानुसार अँजीओग्राफी करण्यात आली आहे. दरम्यान, वंचित बहुजन आघाडीच्या सोशल मीडिया एक्स अकाऊंटवरून प्रकाश आंबेडकरांच्या तब्येतीबाबत माहिती देण्यात येत होती. त्यानुसार, आता त्यांची प्रकृती उत्तम असून त्यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे. मात्र, ते वेलनेस सेंटरमध्ये राहणार आहेत. 'बाळासाहेब आंबेडकर यांची अँजिओप्लास्टी यशस्वी झाली. बाळासाहेब पुढील २४ तास आयसीयूमध्ये वैद्यकीय तज्ज्ञांच्या निरीक्षणाखाली असतील. तमाम हितचिंतक आणि जनतेने दिलेल्या पाठिंब्याबद्दल आणि संदेशांसाठी सर्वांचे आंबेडकर कुटुंब आभार मानते", असेही वंचितच्या ट्विटर अकाऊंटवरून म्हटले आहे.

### नवाब मलिक यांचे जावई समीर खान यांचे निधन

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांचे जावई समीर खान यांचं निधन झाल्याचं वृत्त समोर आले आहे. काही दिवसांपूर्वीच त्यांचा अपघात झाला होता. यानंतर त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र आता त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळते आहे. याबाबत नवाब मलिक यांनी ट्विट करत माहिती दिली आहे. सप्टेंबर महिन्यात समीर खान यांचा कुर्ल्यात कार अपघात झाला होता. यामध्ये ते गंभीर जखमी झाले होते. नवाब मलिक यांची मुलगी आणि जावई रुग्णालयातून नियमित चेकअपनंतर घरी परतत असताना त्यांचा अपघात झाला होता. जेव्हा ते कारमध्ये बसत होते तेव्हा कारचालकानं चुकून एक्सलेटर दाबला.
त्यानंतर कार एका भिंतीला जाऊन धडकली. या अपघातात समीर खान यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. त्यानंतर त्यांना आयसीयूमध्ये उपचार सुरू होते. मात्र आता त्यांची प्राणज्योत मालवली आहे. ट्विटमध्ये नवाब मलिक म्हणाले की, माझे जावई समीर खान यांचे निधन झाले आहे. अल्लाह त्यांना जन्नतमध्ये सर्वोच्च स्थान देवो. या नुकसानीबद्दल आम्ही शोक व्यक्त करत असल्याने, पुढील दोन दिवसांचे माझे सर्व नियोजित कार्यक्रम पुढे ढकलण्यात आले आहेत. तुम्ही समजून घेतल्याबद्दल धन्यवाद, कृपया त्याला तुमच्या आठवणीत ठेवा. या अपघातासंदर्भात पोलिसांनी थार चालवणाऱ्या ३८ वर्षीय चालक अबुल मोहम्मद अन्सारी याला ताब्यात घेतले होते. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू होता.

# मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य सेविकांच्या आंदोलनामुळे क्षयरोग लसीकरणाला अडथळा

## राज्यामध्ये दोन महिन्यांत १२ लाखांपेक्षा अधिक नागरिकांचे लसीकरण

◆ **मुंबई (प्रतिनिधी ) :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२५ पर्यंत 'क्षयरोग मुक्त भारत' करण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार देशभरामध्ये क्षयरोगा विरोधात व्यापक मोहीम हाती घेण्यात आली असून, राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये १८ वर्षांवरील प्रत्येक नागरिकांना बीसीजी लस देण्यात येत आहे. राज्यात ३ सप्टेंबर २०२४ रोजी सुरू झालेल्या या क्षयरोग विरोधी मोहिमेला राज्यातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. मागील दोन महिन्यांमध्ये मुंबई वगळता राज्यातील १२ लाख ३० हजार ३६२ नागरिकांना बीसीजी लस देण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये सर्वाधिक २ लाख ७ हजार ७९५ नागरिकांचे लसीकरण करण्यात आले आहे. त्याखालोखाल सांगली ग्रामीण भागामध्ये १ लाख १० हजार ९१९ नागरिक, धुळ्यामध्ये ९० हजार ६५७ आणि पुण्यामध्ये ७० हजार २७७ नागरिकांना बीसीजी लस देण्यात आली आहे.



'क्षयरोग मुक्त भारत' या अभियानांतर्गत राज्यामध्ये सप्टेंबरपासून नागरिकांचे बीसीजी लसीकरण करण्यास सुरूवात झाली आहे. लसीकरण मोहिमेला सुरुवात झाल्यापासून दोन महिन्यांमध्ये राज्यातील १२ लाख ३० हजार ३६२ नागरिकांचे लसीकरण करण्यात आले आहे. मात्र मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य सेविका वारंवार आंदोलन करत असल्याने मुंबईमध्ये लसीकरण मोहिमेला अद्याप सुरुवात झालेली नाही. 'क्षयरोग मुक्त भारत' या अभियानांतर्गत बीसीजी लस देण्यात येणाऱ्या नागरिकांची पुढील तीन वर्षे नियमित तपासणी करण्यात येणार आहे. ज्येष्ठ नागरिक आणि आजारी रुग्णांचा क्षयरोगापासून बचाव करणे आणि लसीचा ज्येष्ठ नागरिकांवर किती परिणाम होतो ते तपासणे हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट असल्याची माहिती राज्य क्षयरोग निर्मूलन विभागातील अधिकाऱ्याने दिली.

**मुंबईतील १० लाख नागरिकांच्या लसीकरणाचे उद्दिष्ट**

मुंबई महानगरपालिकेच्या २४ प्रभागांमध्ये नागरिकांना बीसीजी लस देण्यात येणार आहे. मात्र मुंबईतील आरोग्य सेविका वारंवार आंदोलन करत असल्याने क्षयरोगाच्या सर्वेक्षणाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे मुंबईमध्ये लसीकरण मोहिमेला सुरुवात झालेली नाही. मुंबई महानगरपालिकेने १८ वर्षांवरील सहा अति जोखीम असलेल्या गटांची निवड केली आहे. या गटातील १० लाख लोकांचे लसीकरण करण्याचे उद्दिष्ट मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने ठेवले असल्याचे मुंबई महानगरपालिकेतील एका अधिकाऱ्याने सांगितले.



**लसीकरणासाठी वर्गाची निवड**

- पाच वर्षांपासून क्षयरोग बाधित
- तीन वर्षांपासून घरातील क्षयरोग रुग्णांच्या संपर्कात
- मधुमेह रुग्ण
- धूम्रपान करणारी व्यक्ती
- कुपोषित व्यक्ती
- ६० वर्षांवरील नागरिक

सरासरी हवेची गुणवत्ता असमाधानकारक

# फटाक्यांमुळे वाढले मुंबईतील प्रदूषण



◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

दिवाळी सुरू झाली असली तरी त्याच्या तयारीला सगळे बऱ्याच काळापासून लागले होते. सोमवारी २८ ऑक्टोबर रोजी दिवाळीसाठी फटाके घेण्यसाठी लहान मुलांकडुन खुप गर्दी असते. तसेच दिवाळीसाठी फराळ बनवण्यापासून नवीन कपडे खरेदी करण्यापर्यंत सगळ्यांची तयारी चांगलीच सुरू होती. दिवाळी आणि फटाके जणू हे एकच समीकरण आहे. फटाक्यांशिवाय दिवाळी ही अपूर्ण आहे असं अनेकदा लोकांना बोलताना आपण ऐकतो. पण त्यामुळे मुंबईच्या प्रदूषणात किती वाढ झाली आहे याची माहिती समोर आली आहे. मुंबईच्या प्रदूषणात वाढ झाली असून हवेची गुणवत्ता ही १७४ एक्युआय नोंदवण्यात आली आहे, तर हवेची गुणवत्ता जर ७४ एक्युआय असेल, तर हे असमाधान कारक आहे. दरम्यान, आपल्या हृदयासाठी जे महत्त्वाचे आहे ते म्हणजे पीएम २.५ आणि पीएम १० याची गुणवत्ता देखील काही ठिकाणी धोकादायक पातळी म्हणजेच ५०० पर्यंत पोहोचली आहे. मुंबईत गुरुवारी खूप फटाके फोडण्यात आले, त्यामुळेच शुक्रवारी सकाळी मुंबईच्या हवेत धूर दिसून आला. केंद्रिय प्रदूषण नियंत्रन मंडळ (सीपीसीबी) आणि बीएमसीकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईची सरासरी हवेची गुणवत्ता आता असमाधानकारक आहे.

सीपीसीबीने दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी सगळ्यात जास्त हवेची गुणवत्ता ही शिवडीमध्ये नोंदवण्यात आली. तर शिवडीच्या हवेची गुणवत्ता ही ३२९ एक्युआय आहे. त्यानंतर कांदिवलीत २७० एक्युआय, मालाडमध्ये २४४ एक्युआय, भायखळात २२८ एक्युआय, वांद्रे खेरवाडीमध्ये २२४ एक्युआय आणि बोरीवलीत २०४ एक्युआय नोंदवण्यात आले आहे. २०० पेक्षा जास्त एक्युआय आहे. हे सगळे आकडे आरोग्यासाठी घातक आहेत.

**पीएम २.५ आणि पीएम १० ची पातळी वाढली**

मुंबईत पीएम २.५ आणि पीएम १० ची धोकादायक पातळी नोंदवण्यात आली आहे. मालाड आणि शिवडीमध्ये पीएम २.५ ची पातळी ही ५०० आणि पीएम १० ची पातळी ही ५०० एक्युआयपर्यंत पोहोचली. कांदिवली पश्चिममध्ये पीएम २.५ ची पातळी ही ४७७ आणि पीएम १० ची पातळी ही ४९१ एक्युआयपर्यंत पोहोचली. बीकेसीमध्ये ३८७ आणि ४१० एक्युआय, चेंबूरमध्ये ४२९ आणि ३५१ एक्युआयची नोंद करण्यात आली आहे.

# जीएसटी विभागाच्या पाच अधिकाऱ्यांवर सीबीआयची कारवाई

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

करविषयक प्रकरणात एका उद्योजकाकडून ५० लाख रुपयांची लाच उकळल्याप्रकरणी वस्तू व सेवाकर विभागाच्या पाच वरिष्ठ अधिकाऱ्यांना सीबीआयने अटक केली आहे. यापैकी दोन अधिकारी भारतीय महसूल सेवेतील आहेत तर उर्वरित अधिकारी जीएसटी विभागात अधीक्षक आहेत. जीएसटी विभागाचे अपर आयुक्त दीपक शर्मा, सहआयुक्त राहुल कुमार, अधीक्षक बिजेंद्र जनावा, निखिल अगरवाल आणि नितीन गुप्ता अशी अटक केलेल्या अधिकाऱ्यांची नावे आहेत. सीबीआयकडून




प्राप्त माहितीनुसार, गोरेगावमधील एका कंपनीचे करविषयक प्रकरण हे अधिकारी हाताळत होते. या प्रकरणाच्या चौकशीदरम्यान या अधिकाऱ्यांनी संबंधित उद्योजकाला अटकेची भीती दाखवत त्याच्याकडे ८० लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली. शेवटी ५० लाख रुपयांवर तडजोड झाली. मात्र, हे पैसे मिळेपर्यंत या अधिकाऱ्यांनी संबंधित उद्योजकाला १८ तास कार्यालयात बसवून ठेवले होते व त्याचा छळ केला, असा त्यांच्यावर आरोप आहे. या उद्योजकाने आपल्या ओळखीच्या माध्यमातून या पैशांची जुळवाजुळव केल्यानंतर त्याला सोडण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. उद्योजकाने लाचखोरीसंदर्भात सीबीआयकडे तक्रार केली. सीबीआयने तक्रारीची पडताळणी केली. महसूल विभागाकडून संमती मिळाल्यानंतर सीबीआयने महसूल सेवेतील अधिकाऱ्यांना अटक केली. त्यानंतर या प्रकरणातील लाचेची ३० लाख रुपयांची रक्कम सीबीआयने जप्त केली आहे.

# कापसाच्या आयातीवर तत्काळ बंदी घालण्याचे मोदींना पत्र

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

कापूस उत्पादनात महाराष्ट्र देशातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असून ४० लाखांपेक्षा जास्त शेतकरी कापसाचे उत्पादन घेतात. राज्यात भरपूर कापूस उत्पादन होत असताना २२ लाख गाठी कापसाची आयात करण्यात आल्याच्या बातम्यांमुळे देशात कापसाच्या भावात मोठी घसरण होण्याची भीती आहे. भारतीय कापूस महामंडळाकडेही विक्री न झालेल्या ११ लाख कापूस गाठी पडून आहेत. शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन केंद्र सरकारने कापसाच्या आयातीवर तत्काळ बंदी घालून भारतीय कापूस महामंडळाला हमीभावाने कापूस खरेदी करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्षनाना पटोले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना



**देशात कापसाच्या भावात मोठी घसरण होण्याची भीती**

पत्र लिहून केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवलेल्या पत्रात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणतात की, सध्या कापसाचे भाव ६५०० ते ६६०० रुपये प्रति क्विंटल असून हा भाव ७१२२ रुपये या हमीभावापेक्षा कमी आहे. बाजारात कापसाला भाव नसल्याने शेतकऱ्यांनी कापूस विकलेला नाही. शेतकऱ्यांकडे कापूस आहे तसेच सीसीआयकडेही कापूस गाठी पडून आहेत. देशात एवढ्या मोठ्या प्रमाणात कापूस असताना कापसाची आयात केल्याने कापूस बाजार कोलमडून त्याचा मोठा फटका शेतकऱ्यांनाच बसेल आणि या निर्णयाचा फायदा फक्त व्यापाऱ्यांना होणार आहे. महाराष्ट्रात कापूस उत्पादक शेतकरी आधीच संकटात आहे, कमी भाव,शेती अवजारांवर १२ ते १८ टक्के जीएसटी आणि अवकाळी पाऊस या दुष्टचक्रात कापूस उत्पादक शेतकरी सापडला असून खराब हवामानामुळे यावेळी १९ लाख हेक्टरील कापूस क्षेत्राचे नुकसान झाले आहे. केंद्र सरकारने जाहीर केलेली नुकसान भरपाईही अद्याप कागदावरच आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजना केवळ विमा कंपन्यांच्या फायद्यासाठी आहे.



दिवाळीच्या काळात भावा-बहिणींना प्रतिक्षा असते ती भाऊबीज सणाची. या दिवशी बहीण भावाला ओवाळते आणि त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते. चिमुकल्यांची मराठमोळ्या वेषात नवीन कपडे घालून साजरी केली भाऊबीज. (**छायाचित्र : अरूण पाटील**)




मुंबईतील दादर येथे आज लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने टोइंग व्हॅनला प्रार्थना करताना आरटीओ पोलीस. (**छायाचित्र अरुण पाटील**)

# म्हाडाच्या लॉटरीत विजेते न ठरलेल्यांना सुद्धा मिळणार मुंबईत घर

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

म्हाडा मुंबई मंडळाने ऑक्टोबर २०२४ साठी २०३० घरांची लॉटरी जारी केली होती. मागील महिन्यातच या घरांची लॉटरी जाहीर झाली होती. या लॉटरीमुळं अनेकांचे मुंबईत घराचे स्वप्न साकार झाले आहे. मात्र, ज्यांना घराची लॉटरी लागली नाही त्यांच्यासाठीही एक आनंदाची बातमी समोर येत आहे. म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या ऑक्टोबर २०२४ मधील २०३० घरांच्या सोडतीतील स्वीकृती पत्र सादर केलेल्या आणि निवासी दाखला प्राप्त झालेल्या घरांच्या विजेत्यांकडून सदनिकेची विक्री किंमत भरून घेण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. ही प्रक्रिया सुरू



असतानाच दुसरीकडे आता मंडळाने परत केलेल्या ४४२ घरांसाठी प्रतीक्षा यादीवरील विजेत्यांना संधी देण्याचा निर्णय घेतला आहे. म्हाडाकडून येत्या काही दिवसातच प्रतीक्षा यादी कार्यान्वित केली जाणार आहे. प्रतीक्षा यादीवरील विजेत्यांसाठी दिवाळीच्या मुहूर्तावर ही आनंदाची बातमी ठरणार आहे. ऐन दिवाळीतच अर्जदारांना घरांची लॉटरी लागणार आहे. मुंबईतील विविध ठिकाणच्या २०३० घरांसाठी ८ ऑक्टोबर रोजी सोडत काढण्यात आली. या सोडतीत २०३० घरांपैकी १३ घरांना शून्य प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे ८ ऑक्टोबर रोजी प्रत्यक्षात २०१७ घरांसाठीच सोडत काढण्यात आली. या सोडतीतील विजेत्यांपैकी १५३० विजेत्यांनी घरासाठी स्वीकृती दिली आहे. स्वीकृती दिलेल्यांपैकी ज्यांच्या घरांना निवासी दाखला प्राप्त झाला आहे अशा ३०० हून अधिक विजेत्यांना तात्पुरते देकार पत्र वितरित करण्यात आले आहे. तात्पुरते देकार पत्र प्राप्त विजेत्यांकडून सदनिकेची विक्री किंमत भरून घेण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. जे विजेते सदनिकेची १०० टक्के रक्कम भरतील त्यांना घराचा ताबा देण्यात येणार आहे. ही प्रक्रिया सुरू असतानाच आता परत करण्यात आलेल्या ४४२ घरांसाठी प्रतीक्षा यादीवरील विजेत्यांना संधी देण्यात येणार असल्याची माहिती मुंबई मंडळातील सूत्रांनी दिली.

ऑक्टोबर महिनाही ठरला सरासरीपेक्षा जास्त उष्ण

# नोव्हेंबरमध्ये थंडी देणार चकवा; मध्य, दक्षिण भारतात पावसाचा अंदाज

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

हिवाळा सुरू झाला असला तरीही नोव्हेंबर महिन्यात राज्यासह देशभरात अपेक्षित थंडी पडण्याची शक्यता नाही. तमिळनाडूच्या किनारपट्टीलगत कमी दाबाचे क्षेत्र तयार होऊन मध्य आणि दक्षिण भारतात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. प्रशांत महासागरातील ला-निना स्थिती डिसेंबर अखेर सक्रिय होण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी शुक्रवारी नोव्हेंबर महिन्याचा अंदाज जाहीर केला. महापात्रा म्हणाले, नोव्हेंबर महिन्यात देशभरात कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज आहे. सध्या उत्तर भारतात कमाल – किमान तापमान सरासरी दोन ते पाच अंश सेल्सिअसने जास्त आहे. ऑक्टोबर महिन्यात पश्चिमी विक्षोप न आल्यामुळे हिमालयाच्या पायथ्यासह उत्तर भारताततही थंडी नाही. नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात पश्चिमी विक्षोपाचा अंदाज नाही. त्यामुळे उत्तरेत आणि पर्यायाने मध्य महाराष्ट्रात अपेक्षित थंडी पडणार नाही. तापमान सरासरीपेक्षा जास्त राहील. नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात तमिळनाडूच्या किनारपट्टीलगत कमी दाबाचे क्षेत्र तयार होऊन त्याची वाटचाल पूर्व आंध्र प्रदेशच्या दिशेने होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संपूर्ण दक्षिण भारतासह मध्य प्रदेशपर्यंत ढगाळ वातावरण तयार होण्याचा अंदाज आहे. मध्य प्रदेशपासून खाली संपूर्ण दक्षिण भारतात जोरदार पावसाचा अंदाज आहे. नोव्हेंबर महिन्यात देशात सरासरी ११८.६९ मिलीमीटर पाऊस पडतो, सरासरीच्या तुलनेत १२३ टक्के पावसाचा अंदाज आहे. ढगाळ वातावरणामुळे तापमान वाढ होईल. त्यामुळे नोव्हेंबरमध्ये संपूर्ण भारतात तापमान सरासरीपेक्षा जास्त राहील.



**ला-निना सक्रिय झाल्यास थंडी**

डिसेंबरमध्ये ला-निना सक्रिय झाला, तर जानेवारीनंतर देशात थंडीचे प्रमाण वाढू शकते. या काळात पश्चिमी विक्षोप देशाच्या दिशेने येत राहिल्यास अपेक्षित थंडी पडेल. प्रामुख्याने जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यात चांगली थंडी पडू शकेल. चांगल्या थंडीसाठी ला-निनासह पश्चिमी विक्षोपांची गरज असते, असेही महापात्रा म्हणाले. लानिनाबाबत जगभरातील सर्वच हवामान संस्थांचे अंदाज चुकले आहेत. आयएमडीच्या दृष्टीने जानेवारी आणि फेब्रुवारी हे दोनच महिने थंडीचे आहेत.

**ऑक्टोबरही सरासरीपेक्षा उष्ण**

देशातील कमाल – किमान तापमानाचा ऑक्टोबर महिनाही सरासरीपेक्षा उष्ण ठरला आहे. ऑक्टोबरमध्ये देशात कमाल तापमान सरासरी ३१.७७ अंश सेल्सिअस असते, ते ३१.९९ अंश सेल्सिअस होते. किमान तापमान सरासरी २०.०१ अंश सेल्सिअस असते, ते २१.८५ अंश सेल्सिअस होते. हवामान विभागाकडील १९०१ पासूनच्या आकडेवारीनुसार ऑक्टोबरमधील आजवरच्या सर्वाधिक किमान तापमानाची नोंद झाली आहे.

# मंदिरात नवजात चिमुकलीचे अर्भक सापडले

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

भाऊबीजेच्या पहाटेच उल्हासनगरातील अंबिका मंदिराच्या बेंचवर नवजात चिमुकलीचे अर्भक टाकून देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ही माहिती समजताच शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन आणि चिमुकलीला शासकीय रुग्णालयात दाखल करून तिला जीवनदान दिले आहे. ती आता ठणठणीत असून तिचे अंबिका असे नामकरण करण्यात आल्याची माहिती शिवसेनेचे उपशहरप्रमुख, आधार प्रतिष्ठाचे अध्यक्ष संदीप डोंगरे यांनी दिली. उल्हासनगर रेल्वे स्थानकाच्या पूर्वेला प्रसिद्ध अंबिका मंदिर आहे. आज पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास एका तरुणीला अंबिका मंदिराच्या आवारातून नवजात अर्भकाच्या रडण्याचा



आवाज आला. तिने शिवसेनेचे राकेश माने यांना फोन करून कळवले. माने यांनी संदीप डोंगरे यांना माहिती दिल्यावर दोघांनी घटनास्थळी धाव घेतली. मंदिराच्या बेंचवर एका गोणीमध्ये स्त्री जातीच्या चिमुकलीचे नवजात अर्भक होते. तिला बाहेर काढून शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात नेण्यात आले. तिथे तिच्या बेंबीवरील नाळ कापून तिच्यावर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. मनोहर बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने उपचार करण्यात आले. आता ती ठणठणीत आहे.

सुविचार -नम्रता माणसाच्या व्यक्तिमत्त्वाला उजाळा देते.

## नंतरचे धक्के......!

भूकंपाचा एखादा मोठा धक्का बसल्यानंतर नंतरच्या काळात लहान लहान धक्क्यांची मालिका सुरू राहते. या लहान धक्क्यांची तीव्रता त्या मोठ्या धक्क्याइतकी नसली तरी वेळीच योग्य काळजी घेतली नाही तर प्रसंगी हे लहान लहान धक्केदेखील मोठे नुकसान करू शकतात. राजकारणाच्या बाबतीतही असेच होऊ शकते. हरियाणा पाठोपाठ महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल काँग्रेससाठी नक्कीच धक्कादायक होते. हरियाणात तर काँग्रेस हमखास सत्तेवर येईल असेच वातावरण होते; परंतु ऐनवेळी वारे फिरले आणि भाजपने तिथे आपल्याकडची सत्ता कायम राखण्यात यश मिळवले. एवढेच नव्हे तर या आधीच्या कामगिरीच्या तुलनेत भाजपने अधिक सरस कामगिरी केली. या धक्क्यातून सावरण्यास पुरेसा वेळ मिळण्यापूर्वीच काँग्रेस आघाडीला महाराष्ट्रातही मोठा धक्का बसला. हरियाणात काँग्रेसने स्वबळावर निवडणूक लढवली होती, तर महाराष्ट्रात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना अशी महाविकास आघाडी निवडणुकीच्या रिंगणात होती. महाराष्ट्रातही या महाविकास आघाडीला अनुकूल असेच वातावरण होते; परंतु हरियाणाप्रमाणेच महाराष्ट्रातही काँग्रेस आघाडीची धूळधाण झाली. या दोन अनपेक्षित आणि मोठ्या धक्क्यामुळे केवळ राज्याचे राजकारण प्रभावीत झाले नाही तर केंद्रस्तरावरही या धक्क्यांचे पडसाद उमटत असल्याचे दिसते. महाराष्ट्रातील पराभवानंतर राष्ट्रीय स्तरावरील काँग्रेस प्रणित इंडिया आघाडीत अस्वस्थता निर्माण झाली आहे. आघाडीतील काही नेत्यांनी राहुल गांधींच्या नेतृत्व क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत आघाडीच्या नेतृत्वात बदल करण्याची अप्रत्यक्षरित्या अपेक्षा व्यक्त केली आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी इंडिया आघाडीचे नेतृत्व करण्यास मी सक्षम आहे असे वक्तव्य केले. त्यांच्या या वक्तव्यावर काँग्रेसमधून अजून अधिकृत प्रतिक्रिया आली नसली तरी इंडिया आघाडीतील एक ज्येष्ठ नेते आणि या आघाडीचा आधारस्तंभ मानले जाणारे शरद पवार यांनी ममता बॅनर्जींकडे इंडिया आघाडीचे नेतृत्व करण्याची क्षमता असल्याचे म्हटले आहे. ममता बॅनर्जींच्या वक्तव्यावर तुमची काय भूमिका आहे असा प्रश्न शरद पवारांना विचारला असता त्यांनी ममता बॅनर्जी या देशाच्या एक प्रभावी नेत्या आहेत. त्यांच्याकडे इंडिया आघाडीचे नेतृत्व करण्याची क्षमता आहे. आज देशाच्या संसदेत त्यांनी जे लोक निवडून पाठवलेत ते अतिशय कर्तबगार, कष्टाळू आणि जागरूक आहेत. त्यामुळे त्यांना हा दावा करण्याचा अधिकार असल्याचे म्हटले. ममता बॅनर्जी राहुल गांधींच्या नेतृत्व क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात आणि शरद पवार सारखे ज्येष्ठ नेते त्यावर मान डोलावतात हे चिन्ह काही इंडिया आघाडीसाठी फारसे चांगले म्हणता येणार नाही. इकडे महाराष्ट्रातही महाविकास आघाडीचे भवितव्य दोलायमान आहे. उद्धव ठाकरे गटाला महाविकास आघाडीत आपली कुचंबणा होत असल्याचे वाटत आहे. त्यातूनच या गटाने पुन्हा हिंदुत्ववादी भूमिकेकडे वळण्याची तयारी सुरू केली आहे. ठाकरे गटाचे हे वळण काँग्रेसच्या पचनी पडणारे नाही. त्यामुळे पुढच्या काळात महाविकास आघाडी एकसंध राहीलच याची शक्यता तशी कमीच दिसत आहे. सध्या शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस समन्वयाची भूमिका घेताना दिसत असली तरी केंद्रातील आणि राज्यातील सरकारला पुढचे पाच वर्ष कोणताही धोका नाही हे चित्र स्पष्ट झाल्यामुळे निकट भविष्यात या पक्षाची भूमिकादेखील बदलण्याची शक्यता नाकारता येत नाही. हरियाणा आणि महाराष्ट्र या दोन्ही राज्यात काँग्रेस आघाडीला यश मिळाले असते तर मात्र परिस्थिती वेगळी असती. त्याचे परिणाम कदाचित केंद्र सरकारच्या स्थिरतेवरही झाले असते; परंतु आता या दोन राज्यांतील मोठ्या विजयामुळे केंद्राची सत्तादेखील स्थिर झाली आहे. एकूणच या दोन मोठ्या धक्क्यानंतरचे लहान-सहान धक्के राज्याच्या आणि केंद्राच्या पुढील राजकारणावर परिणाम करणारे ठरत आहे. या धक्क्यांची मालिका एवढ्यातच थांबेल असे वाटत नाही. महाराष्ट्राचे राजकारण तर अगदीच एकतर्फी झाले आहे. या पुढच्या काळात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गटाला आपले आमदार शाबूत ठेवणे हेच एक काम उरले आहे; परंतु पुढचे पाच वर्ष विरोधी बाकावर बसण्यास त्यांच्यापैकी किती आमदार तयार होतील याबद्दल साशंकताच आहे.

## शक्यता तशी कमीच...!

विधानसभा अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आमदार म्हणून शपथ घेण्याच्या कार्यक्रमावर बहिष्कार घातला. सरकारचा निषेध करण्याचा हा मार्ग कितपत उचित होता, हा वादाचा विषय नक्कीच होता; परंतु त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये विनाकारण तणाव निर्माण झाला. त्यानंतर विधानसभेच्या अध्यक्षपदी राहुल नार्वेकर यांची निवड झाल्यानंतर त्यांच्या स्वागतपर भाषणे सुरू होत असतानाच उद्धव ठाकरे गटाच्या आमदारांनी सभात्याग केला. या पृष्ठभूमीवर विरोधकांकडून केल्या जात असलेल्या विरोधी पक्षनेतेपद बहाल करण्याच्या मागणीवर सत्ताधाऱ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळण्याची शक्यता क्षीण झाली आहे. या निवडणुकीत मविआमधील तीन पक्षांना मिळून केवळ ४६ जागा मिळाल्या आहेत. विरोधी पक्षनेतेपदासाठी आवश्यक असणारे दहा टक्क्यांचे संख्याबळ एकाही पक्षाकडे नाही. विरोधी पक्षनेतेपदावर दावा करण्यासाठी २८८ पैकी १० टक्के म्हणजेच किमान २९ जागा असण्याची आवश्यकता आहे. मात्र, पुरेसे संख्याबळ नसतानाही विरोधी पक्षनेतेपद दिले जाईल, अशी चर्चा असताना तिन्ही पक्षांनी आणि त्यातही उद्धव ठाकरे गटाने विनाकारण वाद निर्माण करीत वातावरण गढूळ केले आहे. त्याचा परिणाम म्हणून नवनिर्वाचित विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विरोधी पक्षनेतेसंदर्भात अतिशय मोघम प्रतिक्रिया व्यक्त करीत हे पद बहाल केले जाणार नाही असेच संकेत दिले आहे. विधानसभेला विरोधी पक्षानेता मिळणार का, या संदर्भात बोलताना नार्वेकर यांनी, हा निर्णय विधानसभा घेत असते. नियमानुसार महाराष्ट्र विधानसभा नियमात ज्या तरतुदी असतील, तसेच महाराष्ट्र विधानसभेच्या प्रथा-परंपरेच्या अनुषंगाने योग्य तो निर्णय घेतल्या जाईल, असे म्हटले आहे. विरोधी पक्षनेतेपद देण्याचे विधानसभा अध्यक्षांनी ठरवले तरी हे पद किमान उद्धव ठाकरे गटाला मिळणार नाही हे निश्चित आहे, कदाचित काँग्रेसच्या नेत्याला हे पद दिले जाऊ शकते. अर्थात ती शक्यतादेखील खूप कमी आहे.

### कटाक्ष



जयंत माईणकर
9821917163

# लोकसंख्या आणि भागवत पुराण !

सरसंघचालक मोहन भागवत यांनी लोकसंख्या स्थिरतेच्या गरजेवर भर देत लोकसंख्या घट रोखण्यासाठी भारतीय कुटुंबांनी किमान तीन मुले जन्माला घालण्याचे आवाहन करत एका नव्या वादग्रस्त विषयाला तोंड फोडले आहे.

जनावरांचे डॉक्टर असलेल्या भागवतांनी लोकसंख्याशास्त्रीय शास्त्राचा हवाला देत म्हटले की २.१ पेक्षा कमी प्रजनन दर असलेल्या समाजांना नामशेष होण्याचा धोका आहे, कारण कालांतराने लोकसंख्या पातळी राखण्यासाठी हा दर आवश्यक आहे आणि हा धोका टाळण्यासाठी कुटुंबांना किमान तीन मुले जन्माला घालण्याचे आवाहन त्यांनी केले. विरोधाभास हा संघ परिवाराचा अविभाज्य घटक आहे. भागवतांचे लोकसंख्येविषयीचे विधान सरकारच्या विद्यमान लोकसंख्या नियंत्रण प्रयत्नांच्या विरोधात आहे.

आता पंतप्रधान नरेंद्र मोदी मातृ संघटनेच्या प्रमुखांचे एकून भारतातील सुमारे पंचवीस कोटी जोडप्यांपैकी प्रजननक्षम असलेल्या अंदाजे दहा कोटी जोडप्यांना तीन अपत्यांची गळ घालणार? तीन अपत्यांचे आवाहन करणारे सरसंघचालक संघाच्या नियमानुसार अविवाहित प्रचारक! त्यामुळे त्यांना मुले सांभाळण्याचा होणारा खर्च, व्याप याची कल्पना नाही असेच म्हटले पाहिजे तर स्वतःची पत्नी जसोदाबेन हिला सोडणाऱ्या पंतप्रधान मोदी यांचीही तीच अवस्था! अविवाहित सरसंघचालक तीन मुले होऊ देण्याचा सल्ला देतात. त्यापेक्षा संघ प्रचारकांना लग्न करण्याची मुभा दिली तर बरं होईल! असो!

गेल्या काही वर्षांमध्ये भारतातील हिंदूंचे प्रमाण सातत्याने कसे घटत आहे आणि त्या तुलनेत मुस्लिमांची लोकसंख्या किती झपाट्याने वाढते आहे, अमक्या काहीशे वर्षांनी 'ते' कसे 'आपल्या'पेक्षा बहुसंख्य ठरतील याविषयी गणिते किंवा खरे तर भाकिते मांडली जातात, पण त्यात कोणतेही तथ्य नसल्याचे 'प्यू रिसर्च सेंटर'सारख्या संस्थांनी सप्रमाण दाखवून दिले आहे. तरीही संघ परिवार नेहमी आपल्या पद्धतीने अफवा पसरवत असतो. मात्र, सरसंघचालकांनी यावेळी कोठेही 'हिंदू' असा शब्द यासंदर्भात वापरलेला नाही हे उल्लेखनीय.

लोकसंख्या वाढीचा प्रश्न उपस्थित होतो तेव्हा केवळ मुस्लीम समाजाला आणि त्या समाजातील चार पत्नी करण्याची मुभा डोळ्यासमोर ठेवले जाते आणि याचा वापर निवडणुकीच्या प्रचारातही होतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभा निवडणुकीत त्यांच्या भाषणात म्हणाले की, मुस्लीम महिला जास्त मुले जन्माला घालतात. हिंदू महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून त्या महिलांना दिले जाईल ज्या जास्त मुले जन्माला घालतात. याच विधानाचा संदर्भ देत असदुद्दीन ओवैसी यांनी भागवतांनी हे मोदींना सांगावे अशी प्रतिक्रिया दिली.

प्रश्न हा आहे की सध्याच्या महागाईच्या काळात प्रत्येक मुलाला पन्नास हजार रुपयांचा मोबाईल, एक लाख रुपयांचा लॅपटॉप देणे आवश्यक असताना तीन मुलांना कसे जोपासणार? म्हणजे मुलांच्या क्षमतेहून त्यांना कमी शिक्षण द्यावे लागेल किंवा काहींना नाकारावे लागेल. आज वन किंवा टू किंवा थ्री बीएचकेमध्ये राहणारे मध्यमवर्गीय झोपडपट्टीत येतील, आहे त्या घरात दाटीवाटीने राहावे लागेल किंवा स्वस्त घराच्या शोधत दूर जावे लागेल. तिन्ही मुली झाल्या तर त्यांची लग्न त्यासाठी लागणारा पैसा याची चणचण भासेल.

व्यापक अर्थाने घटता जननदर आणि त्या अनुषंगाने घटती लोकसंख्या हे आव्हान ठरू लागले आहे. काही युरोपीय देश, जपान, चीन यांसारख्या देशांनी याची गांभीर्याने दखल घेतली आहे. लोकसंख्येचा ढासळता आलेख लक्षात घेऊन चीनमध्ये 'एकच मूल' धोरणाला तिलांजली देण्यात आली. स्वीडनसारख्या स्कँडेनेव्हियन देशांमध्ये मूल झाल्याबद्दल सरकारकडून बक्षीस दिले जाते; परंतु जपान किंवा युरोपीय देश आणि भारत व चीन यांच्यातील समस्यांचे स्वरूप भिन्न आहे.

चीन आणि भारताच्या बाबतीत परिस्थिती वेगळी आहे. दोन्ही देशांनी स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या काही दशकांमध्ये लोकसंख्या नियंत्रणाच्या धोरणाचा अवलंब केला. गुलामगिरीतून गरिबीचाच वारसा मिळालेल्या भारताच्या दृष्टीने लोकसंख्या नियंत्रणाचा मुद्दा सर्वांगीण आर्थिक आणि सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने अत्यंत कळीचा होता. त्यामुळे १९५०मध्ये भारताचा जननदर- प्रत्येक स्त्रीने जन्माला घातलेली सरासरी मुले-६.१८ होता, तो १९८०मध्ये ४.८० वर आला. वैद्यकीय संशोधनास वाहिलेल्या 'लॅन्सेट' या पत्राने या वर्षी मार्च महिन्यात ही आकडेवारी प्रसृत केली. २०२१मध्ये जननदर १.९० पर्यंत खाली आला. लॅन्सेटच्या मते सध्या तो १.२९पर्यंत आला असून, पुन्हा वर जाण्याची शक्यता नाही. इतपत, सरसंघचालक डॉ. भागवत म्हणतात त्यात तथ्य आहे. लोकसंख्याशास्त्रानुसार २.१ च्या वर जननदर नसेल, तर केवळ लोकसंख्येचा ऱ्हास होतो असे नव्हे. उत्पादक लोकसंख्येच्या ऱ्हासाचीही ती नांदी असते. लॅन्सेटच्या अंदाजानुसार, २०५०साली दर पाच भारतीयांमध्ये एक ज्येष्ठ नागरिक असेल. या प्रचंड लोकसंख्येची काळजी घेण्यासाठी पुरेशी युवा लोकसंख्याच उपलब्ध नसेल.

मध्यंतरी चीन आणि नंतर भारतामध्येही आर्थिक विकास साधण्यासाठी 'लोकसंख्या लाभांश' या संकल्पनेचा आधार घेतला गेला. म्हणजे अधिक लोकसंख्या हा बोजा न ठरता, ते समृद्धीचे साधन ठरू शकते, कारण यातून अधिक उत्पादक हात, अधिक कौशल्य, अधिक क्रयशक्ती, अधिक मागणी असा हा हिशेब होता. लोकसंख्या लाभांशाचा उपयोग चीनने करून घेतला.

भारत आता कुठे त्या अवस्थेमध्ये पोहोचला आहे, पण सरसंघचालक म्हणतात त्याप्रमाणे या समस्येवर सोपे किंवा थेट उत्तर सापडत नाही. २.१ जननदर म्हणजे पूर्णांकाच्या परिभाषेत ३ मुलांना जन्म घालावा ही सूचना प्रत्यक्षात अमलात येण्याची शक्यता नाही. भविष्यात कधी तरी सरकारी पातळीवर धोरणबदल झाला, तरच हे शक्य आहे. शिवाय भारत हा प्रगतिशील समाजाकडे वाटचाल करत असल्यामुळे, मुले जन्माला घालण्याच्या निर्णयप्रक्रियेत महिलांचे स्थान प्राधान्याचे असेल. सध्याच्या किती महिला ही उलटीकडील वाटचाल स्वीकारतील, असा प्रश्न आहे.

अतिरेकी डाव्या आणि उजव्या विचारसरणीच्या व्यक्ती सर्वसमावेशक विचार न करता केवळ आपल्या विचारांना अनुकूल निर्णय घेतात. त्याचे परिणाम कितीही भीषण असले तरीही त्याची पर्वा करत नाही, असे माझे ठाम मत भागवतांच्या तीन मुलं जन्माला घाला या विधानाने अधिक पक्के झाले! तूर्तास इतकेच!

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### अवकाश



प्रा.सुरेश चोपणे
9822364473
(खगोल अभ्यासक, अध्यक्ष- स्काय वॉच ग्रूप, सदस्य, इंडियन सायन्स काँग्रेस, मराठी विज्ञान परिषद), चंद्रपूर

# 'इसा'चे प्रोबा- ३ दररोज पाहणार सूर्यग्रहण

आपण वर्षातून बहुदा दोन सूर्यग्रहणे पाहत असतो; परंतु दररोज सतत सूर्यग्रहण पाहण्याची संधी मिळाली तर किती मौज येईल. ही संधी प्रोबा-३ हा उपग्रह देणार आहे. मागील आठवड्यात गुरुवारी ५ डिसेंबर २०२४ रोजी भारताच्या इस्रोने यशाची एक पायरी पुन्हा वर चढली आणि जगातील प्रसिद्ध युरोपियन स्पेस एजन्सी (इसा) चा प्रोबा-३ नावाचा सूर्याला कृत्रिम ग्रहण लावण्याचा प्रयोग करणारा उपग्रह लीलया पी.एस.एल.व्ही-सी-४९ या उपग्रह वाहनाद्वारे अवकाशात प्रक्षेपित केला. आजपर्यंत इस्रोने इतर देशांचे उपग्रह अवकाशात सोडले; परंतु आता या घटनेने इस्रोच्या विश्वस्तेवर शिक्कामोर्तब झाले आहे. काय आहे ही मोहीम पाहूया...

**इसाचा महत्त्वाचा उपग्रह-** २००५ मध्ये ही योजना आखली गेली; परंतु उपग्रहाचे डिझाईन हे २०१८ मध्ये पूर्ण झाले. २०२३ मध्ये दोनही उपग्रहाची तयारी पूर्ण झाली होती. ३ नोव्हेंबरला दोनही उपग्रह बंगलोरजवळील सतीश धवन स्पेस सेंटरला पोहोचले आणि लगेच दोन दिवसानंतर ५ डिसेंबर २०२४ ला इस्रोच्या पी.एस.एल.व्ही. द्वारे अवकाशात सुखरूप सोडले गेले. युरोपियन स्पेस एजन्सी या जगप्रसिद्ध खगोलीय संस्थेची प्रोबा-३ ही द्वी-उपग्रहीय आणि सूर्याचा अभ्यास करणारी तंत्रज्ञान आजमावणारी सूर्य वेधशाळा मोहीम आहे. ही अनेक प्रोबा मालिकेतील तिसरी मोहीम असून यात सूर्याच्या बाह्य आवरणाचा सतत अभ्यास केला जाणार आहे. यात कोरोनाग्राफ स्पेसक्राफ्ट हे ३०० किलो वजनाचे असेल आणि ओकल्टर स्पेसक्राफ्ट हे २५० किलो वजनाचे अशी दोन उपग्रह असून ती अशा पद्धतीने सूर्यप्रदक्षिणा करेल की सूर्याकडील उपग्रह सूर्याची किरणे अडवेल आणि इतक्या अंतरावर असेल की तो सूर्याची डीस्क झाकेल आणि दुसऱ्या उपग्रहाला सूर्याचा करोना सतत पाहता येईल. एक प्रकारे हे उपग्रह दररोज २४ तास सूर्यग्रहण पाहत असेल आणि सोबतच सूर्याच्या बाह्य आवरणाचा अभ्यास करेल. ही मोहीम २ वर्षाची असून एन.एस.आय.एल. या युरोपियन स्पेस एजन्सीतर्फे यान बनविण्यात आले असून इस्रोतर्फे यानाला अवकाशात सोडले आहे. उपग्रहाची जवळची उंची ६०० किमी तर दूरची उंची ६०५३० किमी उंचीची लंबवर्तुळाकार कक्षा असेल. दोन्ही उपग्रह 'सेन्सर आणि आदेश'च्या द्वारे घेतलेली माहिती रेडिओ फ्रिक्वेन्सीद्वारे पृथ्वीवर पाठविल्या जाईल. वैज्ञानिकांच्या मते अशाप्रकारे केला गेलेला हा पहिलाच प्रायोगिक प्रयत्न असून यातून सूर्यापासून बाहेर पडणारा कोरोनल मास इजेक्षण/सौर द्रव्य च्या उगमाचा तपास लावल्या जाईल.

**इस्रोचे मोठे यश-** अलीकडे इस्रोने विविध खासगी वैज्ञानिक संस्थांना अनेक मोहिमेतील उपकरणे बनविण्यासाठी परवानगी दिली असून त्या संस्था उत्तम कार्य करीत आहेत. या मोहिमेतसुद्धा न्यू स्पेस इंडिया या संस्थेने व्यावसायिकरित्या चांगली भूमिका निभावली आहे. पी.एस. एल.व्ही-सी-५९ या ४४.५ मीटर उंचीच्या ४ स्टेज असलेल्या लौंच व्हेईकलचे हे ६१ वे प्रक्षेपण होते. विशेष म्हणजे इस्रोचे हे पहिले असे प्रक्षेपण होते ज्यात इसाचा उपग्रह ६०,५०० किमी उंचीवर अंडाकृती भ्रमणक्षेत सोडण्यात आला. या प्रक्षेपणात खरे तर २ उपग्रह सोडण्यात आलेले होते. हे दोनही उपग्रह सूर्यासमोर एका रेषेत १५० मीटर अंतरावर राहून विविध प्रयोग करणार आहेत. दोन्ही उपग्रहांना एकाची ठिकाणी खिळवून ठेवणे हेच या मोहिमेचे यश असेल. दुसरे वैशिष्ट्य असे की जसे नैसर्गिकरित्या सूर्याची प्रतिमा चंद्र अडवितो आणि पृथ्वीवरून आपल्याला ग्रहण दिसते. अगदी त्याचप्रमाणे अवकाशात दररोज कृत्रिम सूर्यग्रहण करून सूर्याचा अभ्यास करण्याचा हा आगळा वेगळा प्रयोग इसा करणार आहे. सूर्याकडील उपग्रह सूर्याची किरणे एका डीस्कने अडवून ठेवेल तर दुसरा उपग्रह सूर्याचे फोटोस घेऊन सूर्यावरील घडणाऱ्या घटनांचे विश्लेषण करणार आहे. इस्रो ही भारताची संस्था आता जगमान्य अंतरिक्ष संस्था म्हणून गणल्या जात असून अनेक देशांचे उपग्रह व्यावसायिकदृष्ट्या स्वस्तात अचूकपणे अवकाशात सोडली जात आहेत. युरोपियन स्पेस एजन्सीसारख्या जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या अवकाश संस्थेने त्यांचा उपग्रह इस्रोच्या लांच वेहिकलच्या सहाय्याने सोडणे हीच फार मोठी बाब आणि यश आहे.

**मोहिमेचा उद्देश आणि यश-** युरोपियन स्पेस एजन्सीची प्रोबा-३ ही मोहीम एक आगळी-वेगळी मोहीम असून ह्यातून एक नव्या प्रकारचा प्रयोग केल्या जाणार आहे. सूर्याचा अभ्यास करण्यासाठी सोहो अवकाश उपग्रह आधीच कार्यरत आहे. तो विविध उपकरणाच्या माध्यमातून अनेक संशोधन



करीत आहेच; परंतु इसा या अवकाश संस्थेने एकाच ठिकाणी दोन उपग्रहांना १५० मीटर अंतरावर ठेवून बरोबर सूर्य ग्रहणाची स्थिती अवकाशात निर्माण केली आहे. यामुळे या मोहिमेत सतत सूर्याचा कोरोनाचा अभ्यास केला जाईल आणि विशेष म्हणजे सूर्यावरील स्पोटातून जे प्रचंड द्रव्य (सी.एम.व्ही.) बाहेर फेकले जात असते आणि या द्रव्यामुळे अवकाशांतील उपग्रह, पृथ्वीवरील विद्युत ग्रीड्स आणि इलेक्ट्रोनिक उपकरणे ही बिघडू शकतात. याच सौर द्रव्याचा अभ्यास करून त्याच्या उगमाचा तपास केल्या जाणार आहे. या उपग्रहात जी उपकरणे वापरली गेली आहेत त्यात बेल्जीयम येथील रॉयल ओब्सरव्हेटरी आणि लीग स्पेस सेंटर ने बनविलेला कोरोनाग्राफ वापरण्यात आलेला आहे. या उपग्रहाचे पृथ्वीवारील मुख्य नियंत्रण केंद्र हे रेडू, बेल्जियम येथे राहणार आहे. दारा नावाचे दुसरे उपकरण असून ते पी.एम.डी.ओ. या स्वित्झर्लंड येथील संस्थेने बनविले आहे. सेन्सर हे नेदरलँडच्या एका टेक्निकल सेंटरने बनविले आहे. अशा प्रकारे एक नवीन प्रयोग करणारा उपग्रह काय संशोधन करेल याकडे जगाचे लक्ष लागले आहे.

### वर्तमान



स्नेहा राज
9967015899

# 'नेतृत्वहीन इंडिया आघाडीला ममता कशा तारू शकतील?'

हरयाणा, महाराष्ट्र या राज्यांतील निवडणुकांचे आडाखे यशस्वी न झाल्याने इंडिया आघाडीचे नेतृत्व कुणी करावे असे प्रश्न उपस्थित होऊ लागल्यावर प.बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी इंडिया आघाडीच्या निर्मितीत माझा पुढाकार असल्याने, यापुढे त्या इंडिया आघाडीचे नेतृत्व मीच करणार आहे असा दावा केला आहे, त्यास अतिशयोक्ती असेच म्हणावे लागेल. ज्या आघाडीतील घटक काँग्रेस-सपा किंवा काँग्रेस- आप यांचे आपसांत एकमत कधीच झाले नाही. आपसातील मतभेदांमुळे त्यांचे सूर सत्ताधारी पक्षाशी सामना करण्याइतपत जुळून येणे शक्य झाले नाही त्याला घटक पक्षांच्या धोरणांच्या अडचणी आड येत आहेत.

काँग्रेसला लोकसभा निवडणुकीत बऱ्यापैकी यश मिळाले अशा समजुतीने अन्य सहयोगी पक्षांनी पुढाकार घेण्याची कामगिरी सोपवावी अशा अपेक्षा गृहित धरल्या जात असल्या तरीही काँग्रेसला नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत लोकसभेएव्हढे यश मिळविता आले नाही. त्यामुळे इंडिया आघाडीच्या पक्षांची तोंडे वेगवेगळ्या दिशेने भरकटली आहेत.

काँग्रेस पक्ष हा सपा किंवा तृणमूल, आप यांच्याशी जुळवून घेण्याच्या मानसिकतेत नाही. आपल्या धोरणांत काय चुकले याचा अभ्यास करून दुरुस्त्या करण्याऐवजी संघटनात्मक बांधणी करण्यावर भर देण्याकडे आघाडीकडून दुर्लक्ष केले जात आहे. बंगाल या राज्याच्या नेतृत्वाच्या आधारावरून संपूर्ण देशाची धोरणे राबविणे शक्य होणार नाही, त्यांना इंडिया आघाडी पक्षांचे समर्थन मिळणार नाही त्यामुळे ममतांनी इंडिया आघाडीचे नेतृत्व करून त्या नेमके साधणार तरी काय ? असे द्रमुकचे मत आहे. निवडणुकांत एकत्र येऊन पाहिले असता देशाची सत्ता हाती घेणे जमले नाही ते पाहून उत्तरेतील प्रादेशिक पक्ष आपापली राज्ये सांभाळण्याकडे वळले आहेत. त्याचवेळी भाजपाने विरोधी पक्षांच्या रणनीती आणि कमकुवतपणाचा अभ्यास करून विरोधी पक्ष निष्प्रभ करून ठेवलेत. दक्षिणेतील पक्षांच्या मतांनुसार काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे आणि ममतांचा तृणमूल काँग्रेस हा राज्यस्तरीय पक्ष आहे. तृणमूल काँग्रेसने आपल्या राज्यात आपले मॉडेल यशस्वी करून भाजपाला तेथील सत्तेपासून दूर ठेवले असले तरी देशपातळीवर त्यांचें नेतृत्व यशस्वी ठरणार नाही असे दावे करून उत्तरेतील प्रादेशिक पक्ष ममतांच्या नेतृत्वापासून दूर राहणे पत्करत आहेत. इंडिया आघाडीतील उर्वरित पक्षांनी म्हणजेच पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि ठाकरेंची शिवसेना या दोन्ही पक्षांकडून ममतांचे कर्तव्यदक्ष सक्षम नेतृत्व असे म्हणत यांनी अनायसे आपला पाठिंबा जाहीर केला आहे. देशातील प्रश्नांवरून संसदेत गोंधळ घालून सभात्याग करणाऱ्या विरोधी पक्षीय सभासदांच्या अनुपस्थितीत केंद्रातील सरकारने महत्वाची विधेयके मंजूर करून घेत आपली उद्दिष्ट्ये गाठत आहे

याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही हे विरोधी पक्षांनी लक्षात घ्यायला हवे. म्हणूनच आपले स्वतंत्र अस्तित्व गमावलेल्या राज्य व देश पातळीवरील विरोधी पक्षीयांकडून आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी थोडीफार धडपड करण्याचे प्रयत्न सुरू आहेत असे म्हणावे लागत आहे.

### वाचक विचार मंच

## भारतीय भाषांच्या संवर्धनासाठी 'भारतीय भाषा उत्सव' महत्वाचा !

आपल्या बहुभाषिक देशातील लोकांना मातृभाषेव्यतिरिक्त आणखी काही भारतीय भाषा शिकण्यासाठी प्रोत्साहित करणे, भारतातील भाषिक विविधता, कला आणि सांस्कृतिक वारसा समजून घेणे, बहुभाषिकतेला प्रोत्साहन देणे तसेच लोकांनी विविध भारतीय भाषांच्या माध्यमातून राष्ट्राची एकता, सौहार्द आणि अखंडता याचा अनुभव घेणे, त्याच बरोबर 'एक भारत श्रेष्ठ भारत' हा उपक्रम कायम ठेवणे ही उद्दिष्टे समोर ठेवून गेल्या वर्षापासून सुप्रसिद्ध स्वातंत्र्यसैनिक आणि तामिळ महाकवी ।चिन्नास्वामी सुब्रमण्यम भारती यांचा ११ डिसेंबर हा जयंती दिवस 'भारतीय भाषा दिवस' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. यंदा केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून ४ ते ११ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये भारतीय भाषा उत्सव सप्ताह



साजरा करण्यात येत असून यंदा या उत्सवासाठी 'भाषांच्या माध्यमातून एकता' हा विषय घेण्यात आला आहे. राष्ट्रीय पातळीवर 'भारतीय भाषा दिवस' साजरा केल्यामुळे विविध भारतीय भाषांच्या संवर्धनाबरोबरच भारतीय भाषांमध्ये एकोपा निर्माण होण्यास, सांस्कृतिकदृष्ट्या सर्वसमावेशक नवी भारतीय पिढी घडवण्यास आणि तरुण विद्यार्थ्यांना विविध भारतीय भाषांची समृद्धता जाणून घेण्यास मदत होणार आहे.

**प्रदीप शंकर मोरे**
मो.नं. :९८७०७७७२७४

## प्रबोधन व योग्य कारवाई करणे आवश्यक

दूषित पाणी असल्याने घरोघरी वॉटर प्युरिफायर घ्यावे लागतात. या गोष्टी सर्वांना शक्य होतात का? पावसाळ्यात नळाला गढूळ पाणी येते त्याबद्दल कोणाला काही वाटत नाही. शुद्ध पाणीपुरवठा ही संबधित यंत्रणांची जबाबदारी आहे. नदीत कचरा फेकून देणे, निर्माल्य टाकणे यामुळे पाणी प्रदूषित होते. यासंदर्भात प्रबोधन व योग्य कारवाई करणे आवश्यक आहे.

**प्र. मु. काळे**
मो,नं.: ९२७३०४५७९४.

### धुमस

**पालखी**

कसलेले राजकारणी
एक फट खुली ठेवतात
वरवर दाखवतात विरोध
अन् गुपचूप सोबत जेवतात

आजवर राजकारणी
पाळत आले हा नियम
शत्रुत्व असो की मित्रत्व
कधीही ठेवू नये कायम

जिधर बम, उधर हम
जिसकी लाठी, उसकी भैस
जिकडे जमेल भट्टी
तिकडे जाऊन बैस

दुर्बलांच्या दरबारावर
आडदांडाची मालकी असते
भोळ्या जनतेच्या खांद्यावर
ह्या संधीसाधुंची पालखी असते

ॲड. अनंत खेळकर
अकोला

### संवाद

## मुलांना योग्य संस्कार ही पालकांची जबाबदारी!

पालक आणि मुलांमधील संपत चाललेला संवाद किंवा अडनिड्या वयातील विसंवाद हा सामाजिक चिंतेचा विषय झाला आहे. ज्या कुटुंबात असा संवाद असतो त्या कुटुंबातील मुले त्यांच्याही नकळत सुजाण होतात. याचा अनुभव अलीकडेच लखनौ पोलिसांना आणि पालकांना आला. त्या घटनेचे वृत्त प्रसार माध्यमात प्रसिद्ध झाले होते. ती घटना अशी होती की, एक मुलगी पाचवीत शिकते. तिचे वडील राजकीय नेते आहेत. शाळा सुटल्यावर तिच्या अपहरणाचा प्रयत्न दुचाकीस्वारांनी केला. तुझ्या बाबांनी तुला तातडीने बोलावले आहे. आम्हाला तुला घ्यायला पाठवले आहे, असे त्यांनी तिला सांगितले. तथापि अनोळखी व्यक्तींबरोबर जायचे नाही आणि कोणी काही दिले तर खायचे नाही असे माझ्या आईने सांगितले आहे, असे त्या मुलीने त्या व्यक्तींना सांगितले. ते मुलीला जबरदस्ती करत होते, ते गर्दीचे ठिकाण असल्याने त्यांनी तिथून पळ काढला, मुलगी घरी गेल्यावर वडिलांनी तिला बोलावले नसल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. हेच कारण सांगून मुलांचे अपहरण केल्याच्या घटना अधूनमधून घडतात. उपरोक्त घटनेतील मुलीला तिच्या आईने काही गोष्टी शिकवल्या नसत्या तर चित्र कदाचित वेगळे असू शकले असते. मुलांवर योग्य वयात योग्य संस्कार करणे हे प्रत्येक पालकांचे कर्तव्य आहे. त्यासाठी संवाद आत्यंतिक गरजेचा असतो. तो साधण्यासाठी वेळ काढावा लागतो., ज्याची उणीव असल्याचा बहाणा सतत पुढे केला जाताना आढळतो. तथापि संवादाची गरज आणि वेळ वाया कुठे जातो याचे अवलोकन किती पालक करत असतील, हा प्रश्न निर्माण होतो.

संस्कार करण्यात गोष्टी आणि बोधकथा मोलाची भूमिका करतात. मोठ्यांचा आदर करणे, सकारात्मक विचार करणे, नम्रता, प्रामाणिकपणा, प्रेम, आपुलकी, साहचर्य, सहनशक्ती किंवा कर्तव्यभावना अशा अनेक गोष्टी सहज मारलेल्या गप्पांमधूनही शिकवल्या जाऊ शकतात. त्या मुलीच्या आईने तिला सावधान कसे राहायचे, प्रसंगांचा सामना कसा करायचा हे शिकवले असावे म्हणूनच ती



मुलगी धाडसाने तिचे अपहरण टाळू शकली. विसंवादाचे विपरित परिणाम समाजाच्या अनुभवास येतात. बालगुन्हेगारी वाढत आहे. किरकोळ कारणांसाठी पंधरा-सोळा वर्षांची मुले एकमेकांच्या जीवावर उठतात. शाळेतील त्याच वयाची मुले त्यांच्याच मित्रांवर रॅगिंग करतात. अनेक मुले व्यसनांच्या आहारी जातात. तेव्हा मुलांना संस्कार किंवा वळण नाही, असे सरसकट बोलले जाते, पण ते लावण्यात त्यांचे पालक कमी पडले आहेत, ही बाब खरी ठरते.

**मधुकर चुटे**
नागपूर, मो.नं.: ९४२०५६६४०४

### गुल्लेर



नरेंद्र इंगळे
9561226572

## मुदई

'काय करुन राह्यली?'
'भजे काढतो माह्या भावासाठी.'
'रोजच पावनचार करा लागते काय तुह्या भावाले? दहा बारा दिवसापासून सठ खाऊन राह्यला.. भजे.. आलूबोंडे.. इडल्या..डोसे.'
'दुसऱ्यासाठी करुन राह्यली काय? माहा सख्खा भाऊ व्हय.'
'आजून किती दिवस राह्यते तो मुदई?
उदई लागेलोक राह्यते काय?'
'माहा भाऊ काहून नाकात धसला तुमच्या?'
'भुईले भार आहे तुहा भाऊ.. माही गाडी दिवसभर दामटत राह्यते.. पेट्रोल मले टाका लागते. आताही गेला स्कुटी घेऊन.'
'तो श्रीखंड आनाले गेला.'
'पैसे कोनं देले।'
'उधारीत आनते तुमच्या नावानं.'
'हारला मानूस तुमाले.. त्यानं जागोजागी माह्या नावावर उधारी करून ठेवली. मटनावाला सोडला नाही. हाटेलीत जाते अन् माह्या नावावर चिकन खाऊन येते.'
'कोनाले खाऊ घातल्यानं कमी होत नसते.'
एवढं खानं असते काय? आठ दिवसात चार किलो तेल लागलं.. दीड किलो तूप लागलं..'
'तशीच खुराक पाह्यजे.. तुमच्यावानी दीड पोळी खात नाही तो.. तुम्ही मोजून खाता म्हनून तुमच्या आंगात दम नाही.'
'बस झाला लाळ.. उद्या पाठून दे त्याले गावाकडे.'
'कोनी भावाले घरातून काढून देत असते काय?'
'तो इथं राहून रिकामे धंदे करते. खिडकीत उभा राह्यते अन् समोरच्या पोरीवर लाईन मारते.'
'ते पोरगीच तशी आहे.. चांगला पोरगा दिसला की एकटक पाह्यते.'
'भावाचा झाक झाकू नको.. घरी बापाले त्रास देते म्हनून बापानं पाठवून देला.'
'कल्ला करु नका.. तो आला नारू गाडी घेऊन.'
'श्रीखंड आनलं बाप्पू दोन किलो उधारीत.'
'एवढं कायले आनलं बे?'
'तेवढं पाह्यजेच. आठ दिवस घोर नाही.. आताच बाबाचा फोन आला होता.. ते म्हनत, तुले गमते तितके दिवस राह्य.. बाप्पूचा स्वभाव लय चांगला आहे.. जवाई देवमानूस भेटला आपल्याले.'



# बिहार, झारखंड आणि बंगालमध्ये दाट धुके
# केदारनाथ आणि बद्रीनाथ धाम बर्फाच्छादित
# १० राज्यांत थंडीची लाट

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** हिमालयाच्या वरच्या भागात सुरू झालेल्या हिमवृष्टीचा परिणाम मैदानी राज्यांपर्यंत पोहोचला आहे. जम्मू-काश्मीर, लडाख, उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशमध्ये गेल्या चार दिवसांपासून बर्फवृष्टीनंतर थंडी वाढली आहे. मंगळवारी बर्फाळ वाऱ्यांच्या प्रभावामुळे सौराष्ट्र, कच्छ, हरियाणा, दिल्ली, चंदीगड, राजस्थान, उत्तर प्रदेश, पंजाब, जम्मू-काश्मीर, लडाख, उत्तराखंडमध्ये थंडीची लाट सुरू आहे. त्याच वेळी, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, बंगाल, सिक्कीम, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपुरामध्ये दाट धुके आहे. सोमवारी, श्रीनगरमध्ये हंगामातील सर्वात कमी तापमान -५.४ अंश नोंदवले गेले, तर सोनमर्ग येथे -९.७ अंश इतके थंड होते. गुलमर्गमध्ये पारा -९.० अंश सेल्सिअस नोंदवला गेला.

उत्तराखंडच्या केदारनाथ आणि बद्रीनाथ धाममध्ये सोमवारी हंगामातील पहिला हिमवर्षाव झाला. यानंतर राज्य सरकारने दोन्ही ठिकाणी सुरू असलेली विकासकामे थांबवली आहेत. दक्षिण भारतात पुन्हा एकदा पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कर्नाटकमध्ये आज वादळी वाऱ्यासह पाऊस पडू शकतो.

## राजस्थानमध्ये ‘कोल्ड वेव्ह अलर्ट’ जारी

मंगळवारी संपूर्ण राजस्थानमध्ये कोल्ड वेव्ह अलर्ट जारी करण्यात आला आहे. १२ जिल्ह्यांमध्ये थंडीचा प्रभाव ३ दिवस असाच राहील. रात्रीच्या तापमानात कमालीची घसरण झाल्यामुळे सीकरमध्ये गेल्या २४ तासांत सर्वात थंड दिवस होता. उदयपूर, करौली, बारन, चित्तोडगड, भीलवाडा येथे रात्रीचे किमान तापमान ७ अंश सेल्सिअसच्या खाली घसरले. या सर्व शहरांमध्ये काल रात्री शेखावतीमधील सीकरपेक्षाही जास्त थंडी राहिली.

उत्तर प्रदेशः प्रथमच थंडीच्या लाटेचा इशारा, ४२ जिल्ह्यांमध्ये दाट धुके, दृश्यमानता १०० मीटर.

# बांगलादेशी हिंदू म्हणाले– भारतात तुरुंगात राहू, परतणार नाही!

## त्रिपुरातील रुग्णालये व हॉटेलमध्ये बांगलादेशींना बंदी

**आगरतळा :** त्रिपुरा तीन बाजूंनी बांगलादेशने वेढलेला आहे. शेजारील देशाशी त्याचे सांस्कृतिक आणि व्यापारी संबंध आहेत. बांगलादेशातील धोक्यामुळे मोठ्या संख्येने हिंदू लोक देश सोडून त्रिपुरातून अवैधरित्या भारतात प्रवेश करत आहेत. ते म्हणतात की ते भारताच्या तुरुंगात राहतील, पण बांगलादेशात परत जाणार नाही.

बांगलादेशात ५ ऑगस्ट रोजी माजी पंतप्रधान शेख हसिना यांच्या अवामी लीगचे सरकार पडल्यानंतर हिंदूंवरील हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे. इस्कॉनशी संबंधित धार्मिक नेते चिन्मय प्रभू यांना २५ नोव्हेंबरला



अटक करण्यात आली होती. ३० नोव्हेंबर रोजी बांगलादेशातील ब्राह्मणबारिया जिल्ह्यात त्रिपुराहून कोलकाता मार्गे ढाक्याला जाणाऱ्या बसवर हल्ला झाला होता. यानंतर त्रिपुरामध्ये बांगलादेशविरोधात निदर्शने सुरू झाली. आगरतळा येथील बांगलादेशी उच्चायुक्तालयाची तोडफोड करण्यात आली. त्रिपुराच्या हॉटेल असोसिएशन आणि हॉस्पिटलने बांगलादेशी नागरिकांसाठी त्यांची सेवा बंद केली आहे.

# नितीश यांची महिला संवाद यात्रा

वृत्तसंस्था

**पाटणा :** आरजेडी सुप्रीमो लालूप्रसाद यादव यांनी मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या महिला संवाद यात्रेचा समाचार घेतला आहे. ते म्हणाले, ‘अच्छा है यात्रा पर जा रहे हैं. नयन सेंकने जा रहे हैं.’ २०२५ मध्ये २२५ जागा जिंकण्याच्या नितीश कुमारांच्या दाव्यावर माजी मुख्यमंत्री म्हणाले, ‘आधी डोळे शेकून घ्या. बिहारमध्ये महाआघाडीचे सरकार स्थापन होणार आहे.’

तसेच इंडिया आघाडीच्या नेतृत्त्वाबाबत त्यांनी म्हटले आहे की, ‘पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना इंडिया आघाडीच्या नेत्या म्हणून निवडावे. काँग्रेसच्या विरोधाला काही अर्थ नाही. ममता यांना नेता बनवायला हवे.

### लालू म्हणाले- ‘नयन सेंकने जा रहे’



लालू यादव यांच्या वक्तव्यावर जेडीयूने तिखट प्रतिक्रिया दिली आहे. जेडीयूचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष संजय झा म्हणाले, ‘अर्ध्या लोकसंख्येबद्दल इतके खालच्या पातळीचे विचार. इंडिया आघाडीच्या नेत्याच्या या लाजिरवाण्या वक्तव्याचा जितका निषेध करावा तितका कमीच आहे. मुख्यमंत्री नितीशकुमार यांचा आम्हाला अभिमान आहे. त्यांच्या ऐतिहासिक निर्णयांमुळे आज बिहार महिला सक्षमीकरणाचा आदर्श घालून देत आहे.

बिहारचे लोकप्रिय मुख्यमंत्री नितीश कुमार महिलांशी संवाद साधणार आहेत. लालूजींनी ज्या प्रकारचे शब्द वापरले आहे तो चिंतेचा विषय आहे. पूर्वी आम्हाला वाटत होते की ते शारीरिकदृष्ट्या आजारी आहेत. आता ते मानसिक आजारी झाले आहे. त्यांना उपचाराची गरज आहे.

दिल्लीत एका मीडिया एजन्सीशी बोलताना केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह म्हणाले, ‘लालू प्रसाद यादव सुरुवातीपासून स्वार्थी आहेत.’ इंडिया आघाडीच्या नेतृत्वावर म्हणाले- ‘कोण आहेत ममता बॅनर्जी? ज्यांना पश्चिम बंगालचे बांगलादेशात रूपांतर करायचे आहे.

# अदानींच्या घरी लग्नाची धामधूम, धाकट्या मुलाचे शुभमंगल

वृत्तसंस्था

**उदयपूर :** अदानी परिवारात लवकरच एक नवीन सदस्य सामील होणार आहे. गौतम अदानी यांचा धाकटा मुलगा जीत अदानी दिवा शाहसोबत लग्नगाठ बांधणार आहे. या शाही लग्न सोहळ्याचे आयोजन राजस्थानच्या उदयपूर शहरात होणार असून त्यासाठी शहरातील सर्व ५-स्टार हॉटेल्स बुक करण्यात आली आहेत. लग्नाला अनेक बड्या व्यक्ती हजेरी लावण्याची शक्यता आहे. गेल्या

### दिवा जैमीन शाह होणार अदानीची धाकटी सून



वर्षी १२ मार्च रोजी दोघांचा साखरपुडा झाला आणि आता दोघे विवाहबंधात अडकणार आहेत. दिवा जैमीन शाह, जी अदानीची धाकटी सून होणार आहे.



**ठाणे :** ईव्हीएम मतदान यंत्राविरोधात राज्यात महाविकास आघाडीकडून आंदोलनास सुरूवात केली आहे. ठाण्यातही धर्मराज्य पक्षाने विविध चौकात ईव्हीएम विरोधात जनजागृती मोहीम हाती घेतली असून प्रतिकात्मक मतपेट्या चौकात ठेवल्या जात आहेत. या मतपेट्यांमध्ये ईव्हीएम हटविण्यासाठी मतदान घेतले जात आहे.

# बागेश्वर महाराजांच्या धाकट्या भावाने तोडले त्यांच्याशी नाते

## म्हणाले, आता आमचा त्यांच्याशी संबंध नाही

**बागेश्वरः** बागेश्वर धामचे पीठाधीश्वर पं. धिरेंद्र शास्त्री यांचे भाऊ सौरव गर्ग उर्फ शालिग्राम शास्त्रींचे दोन व्हिडिओ समोर आले आहेत. यातील पहिल्यामध्ये ते धिरेंद्र शास्त्रीसोबतचे नाते तोडल्याचा दावा करत आहे. ते म्हणत आहे की आमचा कोणताही विषय धाम किंवा महाराजांशी जोडू नये. आता आमचा त्यांच्याशी संबंध नाही. आम्ही ही माहिती न्यायालयाला दिली आहे.



शालिग्राम यांनी सोमवारी रात्री उशिरा सोशल मीडिया अकाउंटवर हा व्हिडिओ पोस्ट केला. यानंतर मंगळवारी सकाळी त्यांनी आणखी एक व्हिडिओ अपलोड केला. यामध्ये त्यांनी आधीचा व्हिडिओ चुकीच्या पद्धतीने सादर केल्याचे म्हटले. ते म्हणाले, ‘तुम्ही त्या व्हिडिओवर अजिबात विश्वास ठेवू नका आणि तो अशा प्रकारे पसरवू नका.’

# बेस्ट बसचालकाने 30-40 वाहनांना चिरडले: 7 ठार, 49 जखमी

**मुंबई :** कुर्ल्यातील लालबहादूर शास्त्री (एलबीएस) मार्गावरील आंबेडकरनगर भागात ‘बेस्ट’ शहर वाहतूक सेवेच्या बसने ३० ते ४० वाहनांना ठोकरले. यात ७ जणांचा मृत्यू झाला तर ४९ जण जखमी झाले आहेत. सोमवारी रात्री १० वाजेच्या सुमारास हा भीषण अपघात घडला. जखमींना भाभा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांनी मृतांच्या वारसांना ५ लाखांची मदत जाहीर केली आहे.

प्रत्यक्षदर्शी नागरिकांच्या माहितीनुसार, अपघातग्रस्त बस इलेक्ट्रिक वाहन होते. कुर्ला स्टेशनहून येणाऱ्या या बसचा चालक मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवत होता. अर्पण हॉस्पिटलजवळ त्याचे नियंत्रण सुटले व सुमारे ५०० मीटरपर्यंत त्याने रस्त्यावरील ३० ते ४० वाहनांना ठोकरले. यात पाच ते सहा ऑटो रिक्षांचा चक्काचूर झाला. या आपघातातील आरोपीला २१ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली आहे. हा अपघात आहे की, कट याचा तपास बाकी असल्याचे

### मृतांच्या वारसांना ५ लाखांची मदत जाहीर



पोलिसांनी न्यायालयात सांगितले आहे. त्या आधारावर न्यायालयाने आरोपी २१ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

**मुख्यमंत्र्यांकडून मदत जाहीर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कुर्ला येथे बेस्ट बसच्या अपघातात काही लोकांचे मृत्यू झाले, त्याबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. तसेच जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, यासाठी मी प्रार्थना करतो, असेही त्यांनी म्हटले आहे. या घटनेतील मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लाख रुपये आर्थिक मदत देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले आहे.

# दुर्गाडी किल्ल्यावर मशीद नव्हे मंदिरच; कल्याण कोर्टाचा निर्णय

## ‘वक्फ’कडे वर्ग करण्याचा दावाही फेटाळला, 1971 चे प्रकरण

वृत्तसंस्था

**कल्याण :** ठाण्याजवळील कल्याणमधील दुर्गाडी किल्ल्यासंदर्भातील महत्त्वाचा निकाल आज सत्र न्यायालयाने दिला आहे. ऐतिहासिक महत्त्व असलेल्या दुर्गाडी किल्ल्यावर मंदिर आहे की मशीद यासंदर्भातील निकाल न्यायालयाने दिला आहे. दुर्गाडी किल्ल्यावर मंदिरच असल्याचा निर्वाळा न्यायालयाने केला आहे. मागील बऱ्याच काळापासून या प्रकरणावर सुनावणी सुरू होती. अखेर या प्रकरणाचा निकाल आता लागला आहे.

कल्याणमधील सत्र न्यायालयाने ऐतिहासिक दुर्गाडी किल्ल्यावर मशीद नसून मंदिर असल्याचे अध्यादेश जारी केले आहेत.



मंदिर की मशीद हा वाद फार पूर्वीपासून सुरू होता. १९७१ साली ठाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे या प्रकरणी सुनावणी झाली होती. त्यानंतर आता न्यायालयानेच या किल्ल्यावर मंदिर असल्याचे स्पष्ट केल्यानंतर हिंदू संघटनेचे पदाधिकारी व शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते दुर्गाडी किल्ल्यावर जमत आरती करत जल्लोष साजरा केल्याचे पाहायला मिळाले.

**घंटानाद आंदोलन केले होते सुरूः** गेल्या काही वर्षांपासून बकरी ईदच्या निमित्ताने मुस्लीम समुदाय दुर्गाडी किल्ला भागात असलेल्या मशिदीत नमाज अदा करायचे. या कालावधीत खबरदारी म्हणून मंदिर बंद ठेवण्यात यायचे. यामुळे हिंदुत्ववादी संघटनांनी या ठिकाणी घंटा नाद आंदोलन सुरू केले होते.

# बसपा नेत्याच्या दुचाकीला कारने उडविले

**आंबा :** मध्य प्रदेशातील अंबा, मुरैना येथे मंगळवारी सकाळी भरधाव वेगात आलेल्या कारने दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात बसपा नेते डॉ.रामबरन साखवार हे दुचाकीवरून उडून रस्त्यावर पडले. तेथे उपस्थित लोकांनी त्यांना सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नेले. डोक्याला गंभीर दुखापतीने त्यांचा मृत्यू झाला.

बसपा नेते दुचाकीवरून रस्ता ओलांडत असताना सकाळी सव्वा सातच्या सुमारास डायव्हर्जन



### डोक्याला गंभीर दुखापतीने मृत्यू

रोडवर हा अपघात झाला. रामबरन सखवार यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. बसपा नेत्याच्या मृत्यूची माहिती मिळताच सिव्हिल हॉस्पिटलमध्ये समर्थकांची गर्दी झाली.

डॉ.सखवार हे आज सकाळी सातच्या सुमारास गुरुद्वारा मोहल्ला येथील घरातून बाजाराकडे जाण्यासाठी निघाले होते. ते बाईकवर एनसीसी परेड ग्राऊंडजवळ पोहोचले, तेव्हा कारने त्यांना धडक दिली. अंबा पोलीस घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी कार ताब्यात घेतली आहे. पोलीस स्टेशन प्रभारी सतेंद्रसिंह कुशवाह यांनी सांगितले की, चालक कार सोडून पळून गेला असून त्याला अटक करण्यात आली आहे.

# चारा गोळा करण्यासाठी गेलेल्या महिलांवर तीन वाघांचा हल्ला

वृत्तसंस्था

**भोपाळः** चारा आणण्यासाठी गेलेल्या चार महिलांवर वाघाने हल्ला केला असून या हल्ल्यात एका महिलेचा मृत्यू झाला आहे. मध्य प्रदेशच्या भोपाळमधील पन्ना व्याघ्र प्रकल्पात ही घटना घडली. फुलिया साहू असे या मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. या घटनेनंतर आता गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

मीडिया रिपोर्टनुसार,

### एकीचा मृत्यू

सोमवारी सकाळी ९ च्या सुमारास फुलिया साहू अन्य तीन महिलांसह नेहमीप्रमाणे पन्ना व्याघ्र प्रकल्पात चारा गोळा करण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी त्यांना समोर अचानक तीन वाघ दिसले. त्यांना बघून चौघींनी तिथून पळण्याचा प्रयत्न केला. मात्र, फुलिया साहूही महिला वाघाच्या तावडीत सापडली.

# इस्रायलच्या हल्ल्यात सीरियाच्या संरक्षण मंत्रालयाचे संशोधन केंद्र उद्ध्वस्त

**दमास्कसः** इस्रायलने सीरियाची राजधानी दमास्कससह देशभरात जोरदार हवाई हल्ले केले आहेत. दरम्यान, दमास्कस बारजेह भागात इस्रायलने केलेल्या हल्ल्यात सीरियाच्या संरक्षण मंत्रालयाचे संशोधन केंद्र पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे. सीरियन ऑब्झर्व्हेटरी फॉर ह्यूमन राइट्सच्या माहितीनुसार, ‘‘इस्रायली लढाऊ विमानांनी काल सुमारे १०० हून अधिक हल्ले केले. हे हल्ले बारजेह वैज्ञानिक संशोधन केंद्रावरही झाले.’’ असद राजवट संपुष्टात आल्यानंतर कट्टरपंथीयांच्या हाती शस्त्रे लागू नयेत, यासाठी हे हल्ले केले असल्याचे इस्रायलने म्हटले आहे. अमेरिकेसह पाश्चात्य देशांनी २०१८ मध्ये या ठिकाणी हल्ला केला होता. त्यावेळी सांगण्यात आले होते की, हे ठिकाण सीरियाच्या रासायनिक शस्त्रांच्या पायाभूत सुविधांशी संबंधित आहे. सीरियातील बंडखोरांनी राजधानीचे शहर दमास्कसवर नुकताच ताबा मिळवला. त्यांनी एक एक करत सीरियातील सर्व शहरांवर कब्जा केला आहे.



**नवी दिल्लीः** गेल्या दहा दिवसांत दिल्लीतील तापमान सातत्याने कमी होत असून मंगळवारीही तापमाना मोठी घसरण झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते.

# ...जेव्हा अमित शाह विनोद कांबळीच्या उत्तराने स्तिमित झाले

**नवी दिल्लीः** भारताचा माजी क्रिकेटपटू विनोद कांबळीचा वाईट काळ सुरू झाला आहे. एकेकाळचा धडाकेबाज फलंदाज विकलांग अवस्थेत जगत आहे. सचिनचा जीवलग मित्र असलेल्या विनोदला एकेकाळी सचिन सारखेच पैसा, प्रसिद्धी आणि सुखसुविधा मिळाल्या होत्या; परंतु आता परिस्थिती उलट झाली आहे. त्याचे शरीर त्याला साथ देत नाही न त्याच्याकडे चांगले जीवन जगण्यासाठी पैसा उरला आहे.



त्याला अनेक आजार झाले आहेत. आता तो केवळ बीसीसीआयच्या पेन्शनवर दिवस ढकलत आहे. या दरम्यान, देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी त्याच्या भेटीचा एक किस्सा सांगितला आहे.

# नेतान्याहू पहिल्यांदाच भ्रष्टाचार प्रकरणात देणार साक्ष

वृत्तसंस्था

**तेल अवीवः** इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू मंगळवारी प्रथमच भ्रष्टाचाराच्या आरोपांवर साक्ष देण्यासाठी न्यायालयात हजर राहणार आहेत. फसवणूक, विश्वासघात आणि लाचखोरी या तीन वेगवेगळ्या प्रकरणी इस्रायलमध्ये त्यांच्यावर खटला सुरू आहे. नेतान्याहू यांनी कोणतेही गैरकृत्य नाकारले आहे.

इस्रायली पंतप्रधानांनी गाझा युद्ध आणि सुरक्षेच्या कारणास्तव कारवाईला विलंब करण्याची वारंवार मागणी केली आहे. मात्र, न्यायालयाने मंगळवारी पुन्हा सुनावणी सुरू करण्याचे आदेश दिले. पंतप्रधानांच्या सुरक्षेचा हवाला देत न्यायालयाचे कामकाज राजधानी तेल अवीवच्या भूमिगत कक्षेत हलवण्यात आले आहे. २०२० मध्ये सुरू झालेल्या या खटल्यात तीन स्वतंत्र प्रकरणांचा समावेश आहे.

### १४० जणांनी दिली साक्ष

या सर्व प्रकरणात १४० जणांना साक्षीसाठी बोलावण्यात आले आहे. साक्षीदारांमध्ये नेतान्याहू यांच्या काही विश्वासूंचा समावेश आहे जे त्यांच्या विरोधात गेले. यामध्ये माजी पंतप्रधान यायर लॅपिड आणि अनेक माध्यम क्षेत्रातील व्यक्तींचाही समावेश आहे. वकिलांनी रेकॉर्डिंग, पोलीस दस्तऐवज आणि मजकूर संदेशांसह अनेक पुरावे सादर केले आहेत. सध्या तरी २०२६ पर्यंत या प्रकरणी निर्णय अपेक्षित नाही. यानंतर नेतान्याहू सर्वोच्च न्यायालयातही अपील करू शकतात.

यामध्ये नेतान्याहू यांच्यावर त्यांच्या बाजूने बातम्या प्रसिद्ध करण्याच्या बदल्यात मीडियाच्या लोकांना राजकीय लाभ दिल्याचा आरोप आहे.

### फसवणूक, विश्वासघात व लाचखोरीचे आरोप



महागड्या भेटवस्तूंच्या बदल्यात एका अब्जाधीश हॉलिवूड दिग्दर्शकाला फायदा करवून दिला.

# कुटुंबातील चौघांच्या एकाच वेळी जळाल्या चिता

**कुरुक्षेत्रः** हरियाणातील कुरुक्षेत्र येथे एकाच कुटुंबातील चार जणांच्या हत्या प्रकरणात मोठा ट्विस्ट आला आहे. कुरुक्षेत्रातील यारा गावात काही दिवसांपूर्वी एकाच कुटुंबातील जार जणांचे मृतदेह सापडल्याने खळबळ माजली होती. घरात शिरुन कोणीतरी या चौघांची हत्या केल्याचा संशय होता; परंतु पोलीस तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे.

# स्कॉटलँडमध्ये नवरदेव आणि नवरीच्या अंगावर फेकतात चिखल

वृत्तसंस्था

**एडिनबर्गः** सध्या लग्नसराईचा हंगाम आहे, सर्वत्र सनईचे सूर ऐकू येत आहेत. प्रत्येक देशात आणि जाती आणि धर्मात लग्नाच्या वेगवेगळ्या परंपरा आहेत. काही देशात अशा विचित्र परंपरा आहेत, त्यांच्याबद्दल ऐकून लोकांना आश्चर्य वाटेल. स्कॉटलँडमध्ये नवरदेव आणि नवरीच्या अंगावर चक्क चिखल

### अशी आहे प्रथा



आणि सडलेल्या भाज्या फेकल्या जातात, हे ऐकल्यानंतर अनेकजण हैराण झाले आहेत.

# अधिकारी, बापाची प्रॉपर्टी असल्यासारखे वागू लागले

## त्याने कोणाच्या सांगण्यावरून फोन केला?

## भ्रष्ट अधिकाऱ्याला निलंबित करा

## अजय सरवदेंची थेट आयुक्तांकडे तक्रार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्हाधिकारी बीड यांनी काही दिवसापूर्वी अवैध वाळू वाहतूक करणारे दोन टिप्पर पाडळशिंगी टोलनाक्यावर पकडले होते सदरील अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परचा पंचनामा चंद्रकांत शेळके तहसीलदार बीड, आरटीओ यांनी संगनमताने केला होता. सदरील टिप्पर दंडात्मक कारवाईसाठी टायरातील हवा सोडून पोलीस मुख्यालय बीड या ठिकाणी कसलेही प्रकारची नोंद न करता उभा करण्यात आले होते. अवैध वाळू वहातुक करणारे टिप्पर चक्क पोलीस मुख्यालयामधून गायब केले आहे. नेमके टिप्पर गायब केले कुणी याबाबत दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर महसूलच्या एका अधिकाऱ्याच्या फोनवरून सदरील १ टिप्पर दंडात्मक कारवाई न करता सोडून देण्यात



आले असल्याची गंभीर माहिती पुढे आली. सदर प्रकरणी कसल्याही प्रकारची कारवाई जिल्हाधिकारी बीड पोलीस अधीक्षक बीड व महसूल विभागाने केल्याचे दिसून येत नाही.

गौण खनिज विभाग जिल्हाधिकारी कार्यालय बीड, उपविभागीय अधिकारी बीड, तहसीलदार बीड यांच्याशी प्रत्यक्ष भेट घेत टिप्पर गायब प्रकरणी विचारणा केली असता आम्हाला माहीत नाही असे सांगत एकमेकांकडे बोट दाखवत आहेत ही गंभीर बाब आहे.



बीडमधील प्रशासकीय यंत्रणा पूर्णतः ढासळली आहे. याला जबाबदार जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकच आहेत. सत्तेचा गैरवापर करत कोणीही फोन करणार अन् गाड्या सोडणार हे कायद्याच्या चौकटीत बसत नाही. पोलीस मुख्यालयातील टिप्पर सोडण्यासाठी ज्या महसूल अधिकाऱ्याने फोन केला होता त्याच्या शोध व कारवाई होईपर्यंत पाठपुरावा करत राहणार असून पोलीस अधीक्षक बीड कार्यालयासमोर ७ दिवसांनी गाजर दाखवा आंदोलन करणार आहे.

–अजय सरवदे

जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड

## परळीमध्ये वाढदिवसानिमित्त उपक्रम

### राजेभाऊ फड : सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन





परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा माजी केंद्रीय ग्रामविकास मंत्री स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची गुरुवार, दि.१२ डिसेंबर रोजी जयंती आहे तर जाणते राजे शरदचंद्र पवार यांचा ८४ वा वाढदिवस आहे. यानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांच्या संपर्क कार्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन संपर्क कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची जयंती असून या महान नेत्याला अभिवादन करण्यात येणार आहे. तसेच जाणते राजे शरदचंद्र पवार यांचा केक कापून वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे. गुरुवार दि. १२ डिसेंबर रोजी १२ वाजून १२ मिनिटांनी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक, परळी वैजनाथ येथील युवक नेते राजेभाऊ फड यांच्या कार्यालयात हे कार्यक्रम संपन्न होणार असून, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सर्व आघाडीचे पदाधिकारी, ज्येष्ठ आणि युवक कार्यकर्ते तसेच नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन संपर्क कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

---

# खुनाचा तपास सीआयडी मार्फत करा

### मुळूक, गलधर :उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडे मागणी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर जिल्हाभरात तीव्र पडसाद उमटत आहेत. राज्यभर हे प्रकरण गाजत असून याचा तपास सीआयडीमार्फत करुन मुख्य सुत्रधारास अटक करावी व बीड जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था अबाधित राखावी अशी मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी शिवसेनेचे मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे दुपारी अपहरण करुन हत्या करण्यात आली. घटनेच्या दोन दिवस अगोदर देशमुख आणि आरोपींमध्ये वाद झाला होता. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीवर थातूर–मातूर कारवाई करून आरोपीला पाठीशी घातले. त्यानंतर दोनच दिवसांनी सरपंच संतोष देशमुख यांची दिवसाढवळ्या कट रचून अपहरण करून निर्घणपणे हत्या करण्यात आली. देशमुख यांच्या हत्येचे जिल्हयात तीव्र पडसाद उमटत





आहेत. या प्रकरणातील आरोपींच्या अटकेसाठी नऊ तास रास्तारोको करण्यात आला. यामुळे हे प्रकरण राज्यभरात गाजत असून सरपंच देशमुख यांच्या हत्येमागे कोणाकोणाचा हात याचा तपास लागणे गरजेचे आहे. यामुळे सरपंच संतोष देशमुख यांच्या खुन प्रकरणाचा सीआयडीमार्फत तात्काळ करुन मुख्य सुत्रधारास अटक करावी, अशी मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी शिवसेनेचे मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## डॉ.मिलिंद गायकवाडांना पुरस्कार!



लोणार/पुण्यभूमी प्रतिनिधी

उच्च शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेले व कै. कु. दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालय लोणार जिल्हा बुलढाणा येथे प्राणीशास्त्र विभागात,विभाग प्रमुख म्हणून कार्य पाहत आहेत, यांना नुकताच थेम्स इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी फ्रान्स या विद्यापीठाचे मानद D.Sc. Degree , त्याचबरोबर समर्थ फाउंडेशन आणि ग्लोबल एज्युकेशन हब मुंबई या संस्थेचे राज्य शिक्षक गौरव पुरस्कार त्याचबरोबर समाज भूषण पुरस्काराने नुकतेच पुरस्कृत करण्यात आले त्यानिमित्ताने त्यांचे अभिनंदन केले.

# गायरान जमिन नोंदीसाठी टाळाटाळ

### सय्यद सलीम:प्रशासनाच्या दारात आंदोलन

माजलगाव/ पुण्यभूमी प्रतिनिधी

८ फेब्रुवारी २०१४ रोजी प्रसिद्ध झालेल्या शासन निर्णयानुसार गायरान जमीनची नोंद वर्ग क्र.२ मधून वर्ग–१ ला घेन्याचे परिपत्रक आहे.तरी फुलेपिंपळगाव शिवार सर्वे नंबर ९ व माजलगाव शिवारातील सर्व्हे नं.३३९ या गायरान जमीनी वर्ग दोन मध्येच आहेत.माजलगाव तहसीलदार कडुन यात दिरंगाई होत आहे.या नोंदी वर्ग १ मध्ये घेण्यात याव्यात या मागणीसाठी समाजसेवक सय्यद सलीमबापू व एडवोकेट ए.एन.सय्यद यांनी एसडीओ कार्यालयासमोर बुधवार दि.११ रोजी आमरण उपोषण सुरु केले.



फुलेपिंपळगाव ता.माजलगाव गट नं.२० सव्र्हे नं.०९ तसेच माजलगाव शिवारातील सव्र्हे नं.३३९ या जमीनी गायरान जमीनी आहेत.व या जमीनीची नोंद ७/१२ पत्रकाला वर्ग–२ म्हणूनच आहे. वरील शासन निर्णय प्रसिध्द झालेला आहे.व त्या शासन निर्णयानुसार गायरान जमीन ही वर्ग–१ मध्ये आदेश पारीत केलेला आहे.त्या आदेशानुसार जिल्हाधिकारी बीड यांनी सदरील मिळकत वर्ग–१मध्ये करण्यात यावी,याबाबत आपले कार्यालया मार्फत कार्यवाही करण्यात यावी असे आदेशित केले आहे.व तहसिलदार माजलगाव यांना वरील मिळकत वर्ग–१ मध्ये करण्याचे आदेश देण्यात यावेत. अशाही सूचना आहेत.परंतु सदरील प्रकरणात माजलगाव तहसील कार्यालयाकडून पान २ वर...

---

# मोटारसायकल धडकेत एक ठार एकजण जखमी



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी–चांदापूर मार्गावर मोटारसायकलच्या समोरासमोर धडकेत वीटभट्टीवर कामगार असलेल्या व्यक्तीचा जागीच मृत्यू झाल्याची घटना बुधवार दि ११ रोजी सायंकाळी ५ च्या सुमारास घडली असून घटनास्थळी परळी येथील पत्रकार महादेव शिंदे यांनी तत्परता दाखवत मदत कार्य केले.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार चांदापूर रोडवर असलेल्या वीटभट्टी वर कामगार असलेला युवक हा आपल्या मोटार सायकलवर वीटभट्टी कडे जात असताना मोटार सायकल एम एच २२–इ ५३४३ व एम एच ४४–एक्स ९९७० याची समोरासमोर जोराची धडक होऊन यामध्ये वीटभट्टी वरील कामगाराचा जागीच मृत्यू झाला. मयत कामगाराचे पान २ वर...

# परळीत संविधान प्रेमींची निदर्शने

### आक्रमक:परभणीत संविधानाची तोडफोड



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परभणी येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर ठेवण्यात आलेल्या संविधानाची तोडफोड करून विटंबना केल्याप्रकरणी याचा निषेध म्हणून तसेच जातीवादी आरोपीवर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी परळीतील संविधान प्रेमींच्या वतीने राणी लक्ष्मीबाई टावर येथे तीव्र निदर्शने करण्यात आली.

परभणी येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोर असलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची काल जातीयवाद्याने दगडफेक करून तोडफोड केली होती. या घटनेचे तीव्र पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटत आहेत. या अनुषंगानेच परळी वैजनाथ येथे आंबेडकरी समाज व अनुयायांच्या वतीने या घटनेचा निदर्शने करून तीव्र निषेध करण्यात पान २ वर...

# माथेपुरुला कडक शासन करावे

### पप्पु कागदे:परभणीत संविधानाचा अवमान

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

परभणीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे एका माथेफिरुने संविधान प्रतिचा अवमान केला आहे. त्यामुळे संबंध देशवाशीयांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. रिपाइंने या घटनेचा निषेध नोंदवला असून या घटनेतील माथेफिरु आरोपीला कडक शासन करावे अशी मागणी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांनी केली.



सदरील माथेफिरूच्या विरोधात परभणी जिल्ह्यात तीव्र संतापाची लाट असून या घटनेचा रिपाइंकडून तीव्र निषेध नोंदविला जात आहे. देशाच्या सर्वोच्चस्थानी भारतीय संविधान आहे. या संविधानाचा कोणी अवमान करत असेल तर त्याच्याविरोधात कोणत्याही प्रकारची गय केली जावू नये. कारण भारतीय संविधान देशातल्या प्रत्येक व्यक्तीला संरक्षण देण्याचे काम करते.

परभणी शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. त्या पुतळ्यापाशी संविधानाची प्रतिकृती आहे. मंगळवारी (ता.१०) रोजी सायंकाळी ५:३० वाजण्याच्या सुमारास एका माथेफीरुने नासधूस केली.त्यावेळी प्रथमदर्शीनी सदरील माथेफीरुस पोलिसांच्या स्वाधीन केले. जर कोणी त्याचा अवमान करत असेल तर प्रशासनाने देखील ही बाब गंभीरतेणे घेणे गरजेचे आहे. त्यामुळे घटनेचा अवमान करणाऱ्या माते फिरविरोधात परभणी पोलीस प्रशासनाने योग्य ती आणि कडक कारवाई करावी. अशी मागणी रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी प्रसिद्धी पत्रकातून केली.

---

**भयभित** पोलिसांनी गस्त वाढविण्याची मागणी

# अंभोरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घरफोड्या

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या सरहद्दीवर असलेल्या सिना पट्टयातील गावांमध्ये दिवसा घरफोड्यांचे प्रमाण वाढले आहे. गेल्या दोन दिवसांत सुंबेवाडी, ठोंबळसांगवी, हातोळण–औरंगपूर या गावांमध्ये दिवसा घरफोड्याचे प्रकार वाढले. त्यामुळे नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली असून अंभोरा पोलिसांनी गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

आष्टी तालुक्यात कांदा लागवड, गहू पेरणी, तूर सोंगणी अशी पिकांची कामे सुरू आहेत. त्यामुळे शेतकरी दिवसभर शेतात काम करतात आणि भुरटे चोर शेतकऱ्यांची घरे साफ करतात. अंभोरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिंपळा, सुंबेवाडी, ठोंबळसांगवी, खरडगव्हाण, हातोळण, पारोडी गेल्या काही दिवसांमध्ये दिवसा घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ झाली




आहे. काही घरांमधून किळकर रक्कम चोरीला गेली. तर काही घरांमधून चोरांना रिकाम्या हाताने परतावे लागले. शेतकरी दिवसभर शेतात काम करीत असल्याने घरी कोणीही नसते याच संधीचा फायदा घेऊन भुरटे चोर दिवसात शेतकऱ्यांचे घरफोडत आहेत. वाड्या वस्तीवर तर असे प्रकार सर्रास घडत आहेत.

शेतात काम करावा की घराला राखण बसावा अशी परिस्थिती शेतकऱ्यांची निर्माण झाली आहे. त्यामुळे अंभोरा पोलिसांनी तात्काळ दिवसा सीना पट्ट्यातील गावांमध्ये गस्त वाढवावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

गेल्या दोन दिवसांमध्ये सुंबेवाडी गावामध्ये दिवसा घरफोड्या झाल्या त्यात काही रोकड व दागिने चोरीला गेले त्यामुळे पोलिसांनी गावांमध्ये गस्त घालावी, अशी आमची मागणी आहे.

–अशोक कुताळ, सुंबेवाडी

# जीएसटी अभय योजनेची कार्यशाळा

### धोरण:व्यापाऱ्यांनी नोंदविला उत्स्फूर्त सहभाग



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

वस्तु व सेवा कर कार्यालयाच्या वतीने व जालना विभागाचे राज्यकर सहआयुक्त श्रीकांत गांगुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली जीएसटी अभय योजनेबाबत बीड जिल्ह्यातील सनदी लेखापाल व करसल्लागार तसेच व्यापार्यांसाठी बीड येथे मार्गदर्शन कार्यशाळा व चर्चासत्र आयोजीत करण्यात आले होते. या चर्चासत्रात राज्यउपायुक्त योगेश शिंदे यांनी जीएसटी अभय योजना, तिचे स्वरुप, यासह विविधतेवर अभ्यासपूर्ण माहिती दिली तसेच अभय योजनेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

वस्तु व सेवा कर कार्यालय विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या चर्चासत्राला वस्तु व सेवाकर विभागाचे सहाय्यक राज्यकर आयुक्त प्रदिप पान २ वर...